दैनिक **संध्या**

७० वर्ष

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. ०१ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०६६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## अमेरिका-इस्त्रायलपुढे झुकणार नाही : इराणचा इशारा

मुंबई (दै. संध्या) : पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराण-इस्रायल संघर्ष अधिक तीव्र झाल्याचं दिसून येतंय. अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यानंतर इराणने कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. या हल्ल्याचा अमेरिका आणि इस्त्रायलला पश्चाताप होईल असं उत्तर देऊ असं इराणने म्हटलंय. दरम्यान, अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या या हल्ल्यानंतर संयुक्त राष्ट्रांनी तातडीने हस्तक्षेप करावे अशी मागणीही इराणने केली आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने इस्रायलचा हल्ला हा देशाच्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा भंग असल्याचे म्हटलं आहे. एकीकडे चर्चा सुरू असताना दुसरीकडे अमेरिका आणि इस्रायलने हल्ला करत संयुक्त राष्ट्र सनदेतल्या कलम 2(4) चे उल्लंघन केल्याचा दावा इराणने केला. परकीय दबावापुढे आतापर्यंत कधीही झुकलो नाही आणि या वेळी त्याला निर्णायक आणि ठोस उत्तर देऊ असं इराणने म्हटलं आहे. इस्रायलच्या प्रत्युत्तरात्मक कारवायांच्या पार्श्वभूमीवर इराणने संयुक्त राष्ट्रांकडे औपचारिक दाद मागितली आहे.

### ढिंग-टांग




# आदर्श कार्यपद्धती तयार करण्याचे आदेश : मुख्यमंत्री

**मुंबई (दै. संध्या)**

महामार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित होण्याच्यादृष्टीने ज्वलनशील व तत्सम धोकादायक पदार्थांच्या वाहतूकीसंदर्भात आदर्श कार्यपद्धती एसओपी तयार करण्याचे आदेश देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर ३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रोपिलिन ज्वलनशील रसायन वायू वाहून नेणारा टँकर उलटल्याने झालेल्या वाहतूक कोंडीबाबतच्या लक्षवेधीला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या चर्चेत सदस्य जयंत पाटील, आदित्य ठाकरे यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, भविष्यात पुन्हा कधी अशी दुर्घटना घडू नये यासाठी अशा पदार्थांची वाहतूक करणाऱ्या कंपन्यांना यासंदर्भात एसओपी तयार करण्याचे आदेश देण्यात आले असून या पद्धतीच्या आपात्कालीन परिस्थितीत सुरक्षित उपाय



तातडीने करण्यासाठीची रेस्क्यु यंत्रणा, साधनसामुग्री आपल्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे याद्दष्टीने यंत्रणांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या संबंधित कंपन्यांनाही या प्रक्रियेत सहभागी करून, योग्य मार्गदर्शक सूचना ठरवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बसवण्यात आलेली आयटीएमएस ही प्रणाली सध्या कार्यरत आहे. या प्रणालीचा उपयोग करून अशा प्रकारच्या अपघाताच्या प्रसंगी माहिती नागरिकांपर्यंत त्वरित पोहोचवता येईल आणि ट्रॅफिकचे व्यवस्थापन, नियंत्रण, तसेच डायव्हर्शन सुकर करता येईल. आयटीएमएस चा उपयोग करुन अशा घटनांमध्ये प्रवाशांना तातडीने याबाबतची सूचना देण्यासाठीची ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन प्रत्येक प्रवाशास अशा पद्धतीच्या परिस्थितीचा संदेश तत्काळ देता येईल, यासाठीची व्यवस्था करण्याचे आदेश देण्यात येतील, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

केमिकल तज्ज्ञांच्या माध्यमातून ज्वलनशील गॅस गळती बंद करण्याचे अटीतटीचे प्रयत्न चालू होते व अपघातग्रस्त गॅस टँकरमधुन दुसऱ्या रिकाम्या टँकरमध्ये गॅस भरणे देखील चालु होते. अपघातग्रस्त गॅस टँकरमधील गॅस दुसऱ्या दोन रिकाम्या टँकरमध्ये भरुन दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ०१.०५ वा. अपघातग्रस्त टँकरला दुसरी केबिन जोडण्यात आली. त्यानंतर टँकर सुरक्षित स्थळी हलविल्यानंतर रात्री ०१.४५ वाजता पुणे कॉरीडोरमधील तीनही लेनची वाहतूक चालू करण्यात आली. सदर गॅस टँकरमधील वायु गळती रोखणे हे तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक होते.

या वाहतूक कोंडीच्या कालावधीत ३६ तासात वसुल करण्यात आलेला टोल हा संबंधित मालकांना परत देण्याचा निर्णय झाला आहे. तसेच इतर प्रगत देशांमध्ये अशा आपातकालिन परिस्थितीत कोणत्या पद्धतीने तातडीने उपाययोजना राबवण्यात येते याची पडताळणी राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतुक कोंडीची दखल घेऊन त्याबाबत अभ्यास करणे तसेच भविष्यात अशी परिस्थिती उद्भवल्यास तातडीच्या उपाययोजना तसेच अशा परिस्थितीतील वाहतुकीचे नियोजन व प्रवाशांसाठी आपत्कालीन निर्गमन बाबतची कार्यप्रणाली तयार करण्यासाठी भारतीय रस्ते महासभा (आयआरसी) चे माजी अध्यक्ष सी. पी. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे.

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर दि. ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास मुंबईकडे जाणा-या मार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपिलिन गॅस वाहतूक करणारा कोची, केरळ येथून सुरत, गुजरात येथे जाण्याकरिता निघालेला टँकर पलटी होऊन त्यामधील ज्वलनशील वायूची गळती सुरु झाली होती. त्यामुळे, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने द्रुतगती महामार्गावरील वाहतुक बंद करण्यात आली होती. प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून घटनेबाबत प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमातून माहिती प्रसारित करण्यात आली होती. तसेच हेल्पलाईन क्र. ९८३३४९८३३४ या महामार्ग पोलीस विभागाच्या प्रवाशांच्या मदतीकरीता असलेल्या क्रमांकावर प्राप्त कॉल्सवर घटनेची माहिती तसेच वाहतुकीच्या परिस्थितीची माहिती देण्यात येत होती. ठिकाणी महामार्ग पोलीस, रायगड जिल्हा पोलीस दल, फायर ब्रिगेड, एनडीआरएफ, एसडीएमए, बीपीसीएल, हेल्प फाऊंडेशन, काही केमिकल तज्ज्ञ, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल हे घटना घडल्यापासून वायू गळती रोखून वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्नशील होते.

अपघातग्रस्त टँकरमध्ये प्रोपिलीन गॅस असल्याने व हा गॅस अत्यंत ज्वलनशील असल्याने दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी, सायंकाळी ०५.१० वाजता मुंबई बाजूकडे जाणारी वाहतूक अपघातस्थळापासून सुमारे १०० मीटर अलिकडे थांबविण्यात आली होती.

### ब्रेकिंग न्यूज

## बंजारा समाजाचा ST प्रवर्गात समावेशासाठी पुढचं पाऊल

अकोला (दै. संध्या) : बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीला अखेर अधिकृत स्वरूप मिळाले आहे. महाराष्ट्र सरकारच्या आदिवासी विकास विभागाने सहा सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती एम. एल. तहलियानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या अनेक दशकांपासून बंजारा समाजाची ST प्रवर्गात समावेशाची मागणी प्रलंबित आहे. 'हैद्राबाद गॅझेटीयर'मधील उल्लेखाच्या आधारे समाजाने ही मागणी अधिक आक्रमकपणे पुढे रेटली आहे. मराठा आरक्षणाच्या निर्णयानंतर बंजारा समाजानेही त्याच गॅझेटीयरचा संदर्भ देत, जर मराठा समाजाला त्याचा लाभ मिळू शकतो, तर बंजारा समाजाला का नाही? असा सवाल उपस्थित केला आहे.

## सराईत गुन्हेगार अस्लम शेख गजाआड

लोणी काळभोर (दै. संध्या) : लोणी काळभोर परिसरात दादागिरीचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. मुलीबरोबर झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरून एका 46 वर्षीय महिलेला शिवीगाळ, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना शुक्रवारी (ता. 27) दुपारी सुमारे 2 वाजता घडली. घटनेनंतर लोणी काळभोर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली. अस्लम अन्वर शेख (वय 25, रा. जयहिंद नगर वस्ती, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी संबंधित महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला लोणी काळभोर परिसरात कुटुंबासह राहतात. आरोपी अस्लम शेख हा हमालीचे काम करतो. फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. फिर्यादी यांच्या मुलगी आणि आरोपी यांच्यात काही दिवसांपूर्वी वाद झाला होता.

## आंध्र प्रदेशातील फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट : २० लोकांचा मृत्यू

**अमरावती (दै. संध्या)**

आंध्र प्रदेशातील काकीनाडा जिल्ह्यातील वेटलापलेम गावात शनिवारी एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. यात २० जणांचा मृत्यू झाला आणि ६ जण गंभीर जखमी झाले. स्फोट झाला तेव्हा युनिटमध्ये २० हून अधिक कर्मचारी काम करत होते. स्थानिकांनी सांगितले की, दुपारी २ वाजण्याच्या सुमारास हा स्फोट झाला. स्फोट इतका जोरदार होता की त्याचा आवाज ५ किलोमीटरपर्यंत ऐकू येत होता. त्यानंतर गावकरी घटनास्थळी धावले आणि जखमींना रुग्णालयात नेण्यास सुरुवात केली. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, स्फोट इतका शक्तिशाली होता की मृतदेह जवळच्या



■ ६ गंभीर जखमी; ५ किमीपर्यंत ऐकू आला स्फोटाचा आवाज

भातशेतात पडले. हिरव्यागार भातशेतात एक भयानक दृश्य घडले, स्थानिक लोक खताच्या पोत्यांपासून बनवलेल्या "बरकालू" द्वारे मृतदेह घेऊन जात होते.

## हलाल की झटका म्हणणाऱ्यांनी एआयचा विषय आणला हे कौतुकास्पद

**मुंबई (दै. संध्या)**

■ जयंत पाटलांचा सरकारला उपरोधिक टोला

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी आज सभागृहात एआयच्या मुद्यावर बोलताना सरकारला उपरोधिक टोला हाणला. मंदिर की मस्जिद, भगवा की हिरवा, हलाल की झटका हे विषय घेणाऱ्या लोकांनी आज एआय सारखा नवा विषय सभागृहात मांडला ही कौतुकास्पद बाब आहे, असे ते म्हणाले. यावेळी ते दुसरे काहीही नको, फक्त तुमचे बिबटे आवरा, असेही म्हणाले. विधानसभेत आज एआयच्या मुद्यावर नियम 293 अन्वये चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना जयंत पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व



वनमंत्री गणेश नाईक यांनी बैठक घेऊन हे अधिवेशन पूर्ण होण्याअगोदर बिबट्याचे काय करणार? हे सांगावे. आम्हाला तुमच्याकडून बाकी काहीच नको, फक्त बिबट्याचे काय करणार सांगा? तुमचे बिबटे आवरा एवढीच मागणी जनता करत आहे? तुमचे म्हणजे सरकारचे नाही, तर जे जंगलातून बाहेर पडलेत ते. वन विभागाला या प्रकरणी काहीच करता येत नाही. कारण, पिंजरा लावण्यासाठी प्रथम बिबट्याने माणसावर हल्ला करणे बंधनकारक आहे. माणसावर हल्ला झाला की, ते पिंजरा पाठवतात. त्यामुळे सरकारने वन विभागाला बिबट्यांना पकडण्यासाठी सगळीकडे पिंजरे लावण्याचे आदेश द्यावेत. त्यांना पकडून जंगलात नेऊन सोडावेत. जयंत पाटील पुढे म्हणाले, सरकारने या प्रकरणी अधिक पिंजरे बसवावेत, रात्रीची गस्त वाढवावी, ड्रोनद्वारे सर्वेक्षण करावे व सीसीटीव्ही कॅमेरेही बसवावेत. सरकारने वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ठार झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची घोषणा केली, पण आतापर्यंत किती प्रकरणात प्रत्यक्ष नियुक्ती झाली? नियुक्तीसाठी कालमर्यादा निश्चित आहे का? पात्रता निकष सुलभ केलेत का? अनेक कुटुंबीयांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी अनेक महिने खेटे घालावे लागतात. त्यांना मदत मिळत नाही ही शोकांतिका आहे.

# अजित पवारांच्या विमान अपघातावर पतंगबाजी नको

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन; कुटुंबीयांच्या प्रतिष्ठेचा विचार करण्याचा सल्ला*

**मुंबई (दै. संध्या)**

अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या मृत्यूवर कुणीही पतंगबाजी करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. अशा घटना घडतात तेव्हा आपण कोणतीही पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार करण्याचा प्रयत्न करू नये. हा अत्यंत संवेदनशील मुद्दा असतो. या प्रकरणी आपण मृत व्यक्तीच्या पद व प्रतिष्ठेचा तथा त्याच्या कुटुंबीयांच्या प्रतिष्ठेचाही विचार करायला हवा, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व विरोधी बाकावरील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र



पवार पक्षाच्या आमदार हा अपघात नसून, घातपात असल्याचा आरोप करत आहेत. विशेषतः शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या दुर्घटनेविषयी काही महत्त्वपूर्ण खुलासे व पुरावे सादर करून या प्रकरणात घातपाताचा संशय असल्याचा ठाम दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना उपरोक्त आवाहन केले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, आमदार रोहित पवार यांनी माझी भेट घेऊन काही मुद्दे मांडले. त्यांनी दिलेल्या पत्राला मी माझे पत्र जोडून डीजीसीएकडे या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी करणार आहे. पण अशा घटना घडतात तेव्हा आपण कोणतीही पतंगबाजी करू नये. कारण, हा अत्यंत संवेदनशील मुद्दा असतो. दुर्दैवाने जी व्यक्ती मृत आहे, त्या व्यक्तीच्या पद व प्रतिषेठाचा आपण विचार केला पाहिजे. विशेषतः त्याच्या कुटुंबीयांच्या प्रतिष्ठेचाही या प्रकरणी विचार झाला पाहिजे. त्यामुळे या प्रकरणी कोणतीही पतंगबाजी किंवा हवेत गोळीबार करू नये असे मला वाटते. या प्रश्नावर याहून अधिक मी बोलू इच्छित नाही.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विलिनीकरण तथा सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीसाठी करण्यात आलेल्या कथित घाईच्या मुद्यावरही भाष्य केले. तसेच सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा निर्णय हा आमचा नव्हे तर राष्ट्रवादीचा होता असेही स्पष्ट केले. ते म्हणाले, सुनेत्रा पवार यांच्याविषयी घेण्यात आलेल्या निर्णयात आमच्या पक्षाचा कोणताही सहभाग नव्हता. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी त्याची माहिती आम्हाला दिली. ते कागदपत्रांसह माझ्याकडे आले. त्यांनी एक तारीख दिली. त्यावर माझा कोणताही आक्षेप नव्हता. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी विनंती केली आणि आम्ही ती मान्य केली. तो निर्णय त्यांच्या पक्षाचा होता. आमचा नव्हता.

## अब्रू असलेल्यांनी दाव्याच्या गप्पा माराव्यात : अंबादास दानवे

**मुंबई (दै. संध्या)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी संदीपान भुमरे आणि त्यांच्या समर्थकांवर अत्यंत गंभीर आरोप करत थेट आव्हान दिले आहे. ज्याला अब्रू असते, तो अब्रू नुकसानीचा दावा करतो; मी अशा दाव्यांना फुकटची भीकही घालत नाही, अशा शब्दांत त्यांनी भुमरेंनी दिलेल्या नोटीसीवर प्रतिक्रिया दिली आहे. अंबादास दानवे म्हणाले की, समृद्धी महामार्गाचे 1150 कोटी रुपये ढापण्याचा प्रयत्न झाला आहे. एक साधा ड्रायव्हर एवढी हिंमत करूच शकत नाही. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, 1985 मध्ये जन्मलेल्या व्यक्तीचा 1971 चा हिबानामा कसा असू शकतो? तसेच, एखादे हिंदू कुटुंब मुस्लिमाला हिबानामा



(भेटपत्र) कसे करून देऊ शकते, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. सोमवारी मी कलेक्टरांकडे जाणार आहे, तो हिबानामाच मी देतो तुम्हाला मग त्यांनी सांगावे हा मी नाहीच म्हणून. त्यामध्ये त्यांचे आधार कार्ड सुद्धा असतील.

## होळी रे होळी ! धूलिवंदन मंगळवारी 3 मार्च रोजीच, चंद्रग्रहणाच्या काळातही साजरा करता येणार सण, पंचांगकर्ते मोहन दाते यांची माहिती

**छ. संभाजीनगर (दै. संध्या)**

यंदा 3 मार्च रोजी चंद्रग्रहण आहे. त्यामुळे धूलिवंदन साजरा करता येणार की नाही, रंग खेळणे जमणार की नाही, याबद्दल नाना शंका कुशंका व्यक्त केल्या जात होत्या. मात्र, चंद्रग्रहण असूनही याच दिवशी धूलिवंदनाचा दिवस साजरा करता येईल. रंग खेळता येईल, अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली.

धूलिवंदनादिवशी मंगळवारी चंद्रग्रहणाचे वेध सकाळी सूर्योदयापासून सुरू होत आहेत. या वेदकाळामध्ये संपूर्ण दिवसभरामध्ये आपले नित्य नैमित्तिक पूजा, अर्चा अभिषेक, श्राद्ध इत्यादी सर्व धार्मिक कृत्ये आपण करू शकतो, अशी माहितीही दाते यांनी दिली.



**पौर्णिमा प्रदोषकाळात नाही** : पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'यावर्षी 2 मार्च रोजी सोमवारी होलिकादहन आहे. ते संध्याकाळी सूर्यास्तानंतर प्रदोषकाळात आपल्याला नेहमीप्रमाणे करायचे आहे. दुसऱ्यादिवशी पौर्णिमा प्रदोषकाळात नाही. तसेच या दिवशी चतुर्दशी आहे. त्यामुळे सूर्यास्तानंतर आपण नेहमीप्रमाणे भद्रा असतानासुद्धा होलिकादहन करायचे आहे.'

**ग्रहण सूर्यास्तानंतर दिसेल** : पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'मंगळवार 3 मार्च रोजी धूलिवंदनाचा दिवस आहे. या दिवशी चंद्रग्रहण आहे. हे चंद्रग्रहण ग्रसतोदित असल्याने सूर्यास्तानंतर संध्याकाळी 6 वाजून 48 मिनिटापर्यंत या काळामध्येत ते आपल्याला दिसणार आहे. त्याचा स्पर्श दुपारी 3 वाजून 20 मिनिटांनी आहे. स्पर्श आणि मध्य दिवसा असल्यामुळे हे चंद्रग्रहण भारतात दिसणार नाही.'

**ग्रहणकाळात काय कराल?** : पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'चंद्रग्रहण फक्त संध्याकाळी सूर्यास्तानंतर अल्पकाळ आपल्याला दिसणार आहे. या अल्पकाळात काही ठिकाणी तीन ते चार मिनिट, तर काही ठिकाणी दहा, पंधरा, वीस मिनिटे दिसणार आहे. या काळात जेवढे शक्य असेल तेवढे स्नान, जप इत्यादी गोष्टी आपण कराव्यात.'

**ग्रहणाचे मोक्षस्नान करा** : पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'जर या वेळात काहीच शक्य झाले नाही, तर 6 वाजून 49 मिनिटांनंतर ग्रहणाचे मोक्षस्नान करावे. ग्रहणाचा वेध सकाळी सूयीदयापासून सुरू होत असल्याने आपण या वेधकाळामध्ये संपूर्ण दिवसभरामध्ये आपले नित्य नैमित्तिक पूजा, अर्चा अभिषेक, श्राद्ध इत्यादी सर्वे धार्मिक कृत्ये आपण करून शकतो.'

**भोजनाचा निषेध सांगितला** : पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'चंद्रग्रहणाच्या काळात फक्त या ठिकाणी भोजनाचा निषेध आपल्याला सांगितलेला आहे. तरीही जे अशक्त आहेत, आजारी आहेत, वृद्ध आहेत, बाल आहेत, गर्भवती स्त्रिया या सर्वांनी अकरा वाजेपर्यंत अन्न घेण्यास हरकत नाही. त्यानंतर मात्र संध्याकाळी मोक्ष झाल्यावर आपण भोजन करायचे आहे.'

**रंग खेळू शकतो** : पंचांगकर्ते मोहन दाते म्हणाले की, 'अर्थात या सर्व गोष्टी करता येत असल्यामुळे जो धूलिवंदनाचा दिवस आहे त्या दिवशी होळी, रंग खेळणे इत्यादी सर्व गोष्टी आपण करू शकतो. त्याला कोणताही निषेध नाही. धूलिवंदनाच्या दिवशी जरी चंद्रग्रहण असले तरी आपण होळीचा, रंगखेळण्याचा सण साजरा करू शकतो.' त्यांनी धूलिवंदनाच्या साऱ्यांना शुभेच्छाही दिल्या.

## संपादकीय

# आर्थिक विश्वासार्हतेचा पाया

मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे. शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वर्षासाठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय-टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे.

## संस्कृत सुभाषित

अनाहूत: प्रविशती अपृष्टो बहु भाषते
अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधम:।।
(उद्योगपर्व, अध्याय ३३, ४१, महाभारत)

## गुरु वचन

### परमेश्वराचे नामस्मरण करा

मानवी शरीर परमेश्वराच्या कृपेने आणि केवळ परमेश्वराच्या प्राप्तीसाठीच मिळते. यासाठी सर्व काम सोडून परमेश्वराचे नामस्मरण करायला हवे. ज्यांचे वय जास्त झाले आहे, त्यांना परमेश्वराचे नामस्मरण करणे आहेच, पण ज्यांचे वय कमी आहे, त्यांनीही स्वच्छ मनाने परमेश्वराचे नामस्मरण करावे लागणार आहे. सृष्टीतील सर्व कामे करायची आहेत पण आपला मुख्य हेतू आणि लक्ष्य केवळ परमेश्वराला प्राप्त करणे असावे. अस्तित्त्वामध्ये सत्ता एका परमात्म्याची आहे. संसाराकडे ध्यान दिले ते सर्व नष्ट होणार आहे आणि निरंतर नष्ट होत राहील. आपण आपल्यापरीने पहायला हवे की, आपण जेव्हा जन्मलो त्यावेळी शरीराची कशी अवस्था होती व आज कशी आहे. संसार नेहमी बदलणारा आहे तर परमात्मा कायमस्वरुपी आहे. परमात्मा आपला आणि आपण परमात्म्याचे आहोत. या दृढता असायला हवी. एखादा लहान मुलाला आईविषयी विचारले तर तो म्हणते ती माझी आई आहे. परंतु आई का आहे याचे तो उत्तर देत नाही. त्याच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो की आई त्याची का आहे. आई त्याची आहे याविषयी काही संशय नाही. अशाप्रकारे आपणही संशय करु नका आणि ही गोष्ट पूर्ण विश्वासाने निश्चित करा की, परमेश्वर माझा आहे आणि परमेश्वराशिवाय दुसरे काहीही माझे नाही. कारण ते बाकी सर्व तुम्हाला सोडून जाणार आहेत. ज्याच्याविषयी आपण चिंतेत राहतात. पैसे, घर, जमीन सर्वकाही आहे तिथेच राहणार आहे आणि त्याचे स्मरणही राहणार नाही. स्मरण राहील तर परमेश्वराचे. जर आपल्याला स्मरण राहत असेल तर तुम्ही सांगा आपण या जन्मापूर्वी कोठे होता. आपले आई-वडिल, भाऊ-बहीण, स्त्री-पुरुष आदी कोन होते, आपले घर कोणते होते. जसे पूर्वजन्माची आठवण नाही तसेच या जन्माचीही आपल्याला आठवण राहणार नाही. ज्याची आठवणही होणार नाही, त्यासाठी आपण विनाकारण परेशान होत आहात.

## उपदेशकथा

### संकटांना तोंड द्या!

भारत भ्रमणाच्या काळात स्वामी विवेकानंद वाराणशीत आले असताना घडलेला हा प्रसंग. दुर्गामातेचे दर्शन घेऊन स्वामीजी परत चालले होते. रस्त्याच्या एका बाजूला पाण्याचा तलाव होता आणि दुसरीकडे एक उंच भिंत होती. स्वामीजी त्या रस्त्याने थोडे पुढे गेले तोच वानरांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. वाराणशीची वानरे दांडगट असतात. स्वामीजी घाबरून पळू लागले पण वानरे आणखी वेगाने त्यांच्या मागे लागली. त्यांच्या पायात आडवी येऊ लागली. चावे घेण्याचा प्रयत्न करू लागली. स्वामीजी पुरते गांगरले. रस्त्याच्या बाजूला बसलेल्या एका साधूने हा प्रकार पाहिला आणि तो स्वामीजींना ओरडून म्हणाला, पळू नका, वानरांकडे तोंड करा! त्यांचे म्हणणे ऐकून स्वामीजी उलटे फिरले आणि वानरांकडे तोंड करून उभे राहिले. त्याबरोबर ती वानरे घाबरून एकदम मागे सरली आणि नंतर पळून गेली. पुढे न्यूयॉर्कमध्ये एका सभेत स्वामीजींना हा प्रसंग सांगितला आणि मग ते म्हणाले, या प्रसंगातून मी आयुष्यातला एक फार मोठा धडा शिकलो, तो म्हणजे संकटांपासून पळून जायचे नाही तर त्यांना तोंड द्यायचे, त्यांच्याशी सामना करायचा?

कथा उपदेश : संकटाला घाबरून न जाता त्याच्याशी सामना करायला शिकले पाहिजे.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:त्रयोदशी १९:०९:२८ |
| १ मार्च २०२६ | नक्षत्र:पुष्य ०८:३४:०१ |
| रविवार | योग:शोभन १४:३२:२४ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:कौलव ०७:५४:१३ |
| फाल्गुन शके | करण:तैतिल १९:०९:२८ |
| संवत्- १९४७ | करण:गर ३०:२९:४९+ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | सूर्य:कुम्भ |
| अयन- उत्तरायणारंभ | चन्द्र:कर्क |
| मास- फाल्गुन | हिजरी सन् – १४४५ |
| ऋतु- सौर वसंत | मुस्लिम मास – रमजान |
| शुक्ल पक्ष | तारीख – ११ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८७४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | | 2 | | 6 | 5 | | |
| | 9 | 2 | | | | | 4 | |
| | 3 | | | | 4 | | | 6 |
| 3 | | 5 | | 7 | | 1 | | |
| 7 | 6 | | | 2 | | | 8 | 5 |
| | | 9 | | 6 | | 4 | | 3 |
| 9 | | | 8 | | | | 5 | |
| | 2 | | | | | 7 | 3 | |
| | | 6 | 7 | | 3 | | | 1 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८७३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 7 | 9 | 1 | 4 | 2 | 6 | 5 | 8 |
| 4 | 1 | 5 | 8 | 9 | 6 | 7 | 2 | 3 |
| 2 | 8 | 6 | 3 | 7 | 5 | 4 | 1 | 9 |
| 6 | 9 | 1 | 4 | 5 | 3 | 2 | 8 | 7 |
| 7 | 4 | 3 | 2 | 1 | 8 | 5 | 9 | 6 |
| 5 | 2 | 8 | 9 | 6 | 7 | 1 | 3 | 4 |
| 9 | 5 | 2 | 6 | 8 | 4 | 3 | 7 | 1 |
| 1 | 6 | 7 | 5 | 3 | 9 | 8 | 4 | 2 |
| 8 | 3 | 4 | 7 | 2 | 1 | 9 | 6 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ८६ – लुसियस कोर्नेलियस सुलाच्या नेतृत्त्वाखाली रोमन सैन्य अथेन्समध्ये घुसले व तेथील राज्यकर्ता ॲरिस्टियोनला पदच्युत केले.
- १५६२ – फ्रांसमधील वासी शहरात कॅथोलिक जमावाने १००हून अधिक हुगेनो व्यक्तिंना मारले.
- १५६५ – ब्राझिलमध्ये रियो दि जानेरो शहराची स्थापना.
- १८०३ – ओहायो अमेरिकेचे १७वे राज्य झाले.
- १८१५ – एल्बाहून सुटका करून घेउन नेपोलियन बोनापार्ट फ्रांसला परतला.
- १८४० – ॲडोल्फ थियेर्स फ्रांसच्या पंतप्रधानपदी.

### राष्ट्रीय

- २००७ – छत्तीसगढच्या दंतेवाडा जिल्ह्यात नक्षलवाद्यानी भूसुरंग स्फोट केला यात सहा पोलिसांसह ८ लोक ठार झाले.

### जन्म

- १८१० – फ्रेडरिक चॉपिन, पोलिश संगीतकार याचा जन्म.
- १८८८ – इवार्ट ॲस्टील, ईंग्लिश क्रिकेटपटू याचा जन्म.
- १९१० – डेव्हिड निवेन, इंग्लिश अभिनेता याचा जन्म.
- १९१८ – होआव गुलार्ट, ब्राझिलचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १९२२ – यित्झाक राबिन, इस्राईलचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९४२ – रिचर्ड मायर्स, अमेरिकन सेनापती याचा जन्म.

### निधन

- ११३१ – स्टीवन दुसरा, हंगेरीचे राजा यांचे निधन.
- १७९२ – लिओपोल्ड दुसरा, पवित्र रोमन स्राट यांचे निधन.

## : SMS :

Sardarji got sms
from his girlfriend:
'I MISS YOU"
can u think what
sardarji replied....
??????
??????
??????
Think.......
......??????
I Mr.You

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.३ | १९.९ |
| अहमदनगर | २९.९ | १८.३ |
| अकोला | ३३.४ | २२.६ |
| अमरावती | ३१.९ | २२.४ |
| बीड | ३३.१ | २१.३ |
| भंडारा | ३२ | १९.५ |
| बुलढाणा | २८.३ | १३.८ |
| चंद्रपूर | ३२.६ | २१.२ |
| चेन्नई | ३५.८ | २१.१ |
| नवी दिल्ली | २८.८ | १६.७ |
| धुळे | ३१.६ | २०.३ |
| गोंदिया | ३०.६ | १८.९ |
| जळगाव | ३३.४ | २१.४ |
| कोल्हापूर | ३०.६ | १६.८ |
| लातूर | ३०.८ | २०.३ |
| मुंबई | २८.७ | २४ |
| नागपूर | ३१.२ | १९.१ |
| नांदेड | ३३.६ | २२.६ |
| नंदूरबार | २८.९ | २०.६ |
| नाशिक | २९.१ | १५.९ |
| पुणे | २८.७ | १६.४ |
| पंढरपूर | ३१.४ | २०.१ |
| सातारा | ३१ | १५.५ |
| सांगली | ३२ | १७.९ |
| सोलापूर | ३१.८ | २१.८ |
| वर्धा | ३२ | २१.८ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार-मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**कर्क :** तरीही जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. मिथुन : आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**तुळ :** हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रवृत्ती प्रवृत्ती वाढीस लागेल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.


**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**मीन :** नोकरी-व्यवसायात उत्तम स्थिती राहील. महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८७४



**आडवे शब्द**

१. रात्रीच्या रात्री
४. फोटो
६. राष्ट्रगीताची सुरुवात
११. शंभर पैसे
१३. बाजेची कापडी पट्टी
१४. सोन्याचा धागा
१५. वाईट
१७. हमाल
१९. निबर, एक इंग्रजी महिना
२१. अडत्या
२३. खर्चच्या विरूद्ध
२५. पोवाडे म्हणणारा
२७. फांदी तुटतानाचा आवाज
२९. नाणी पारखणारा, दत्तो वामन यांचे आडनाव
३१. रोख
३२. नरकासुराचे प्रतीक म्हणून फोडले जाणारे फळ
३४. मालक
३५. हे जसे-फळ तसेच!
३६. पाळता येईल असा प्राणी
३८. कोष्टी, कापड विणणारा
४०. दिल्लीचे विमानतळ
४२. छोटा, लहान
४३. सैन्य
४४. कवडीमोल
४६. शहर
४८. मुलगा, पुत्र
५१. जुळे
५२. उगीच
५४. 'सबसे तेज' वृत्तवाहिनी
५६. शेतकरी (हिंदी)
५८. गाजावाजा
५९. पळून जाणे
६०. मोठी गंमत
६१. रंग बदलणारे फूल
६२. नम्र, वाकलेला
६४. एक आंबट-गोड फळ
६५. खूप
६६. चालू दिवस
६७. ओघ, पाण्याचे वाहणे
६९. थडगे
७१. फटाक्याची माळ
७२. नारळ वाढवण्याची प्रथा या कुप्रथेऐवजी प्रचलित झाली
७४. मृत्यूदेवता
७५. जनक राजाची मुलगी
७८. झडती (हिंदी)
७९. एकूण एक, सर्व
८०. फेटाळणे
८१. लक्ष्मी

**उभे शब्द**

१. अडखळत बोलणारा
३. झाड, वृक्ष
४. सावली
५. पुष्कळ
६. आई-वडील
७. नवीन
८. नडलेला अडलेला
९. मला
१०. श्रेष्ठ पुरुष
१२. पैंजण
१५. पाषण
१६. पाणकोंबडा
१७. हिंदुस्थान
१८. राबता, ये-जा
२०. धुंदी, कैफ
२२. आवडता, प्रिय
२४. कापड विणण्याचे साधन
२६. साठावा वाढदिवस
२८. कोवळी फांदी
२९. चाळीस शेर
३०. पोते शिवण्याची सुई
३३. जाड दोर
३४. पृथ्वी
३६. हालचालीवर ठेवलेली नजर
३७. वर्तुळ
३८. गणपती
३९. कमीत कमी व जास्तीत जास्त
४०. अधिक प्रमाणात लोह असणारी पालेभाजी
४१. दुसऱ्याचे विचार जाणणारा
४५. श्रीकृष्णाचे एक नाव
४७. रविवार
४९. दृष्टीभेट
५०. प्रकाश, कांती
५३. मूळ अर्थ सुंदर, शहाणा प्रचलित अर्थ शहरी
५४. देवाण-घेवाण
५५. रेलण्याची उशी
५७. प्रामाणिक
६०. श्रीमंत
६१. दाहक आम्ल (हिंदी)
६३. ग्रामीण बोलीत तेव्हा
६५. लाभदायक
६६. आजूबाजूला
६८. अंकित माणूस, हेर
६९. लावणीतील पास असे असते!
७०. प्रजा
७३. मांडणी
७४अ. मज
७५. एक मिश्र धातू
७६. ओटा, पार
७७. न्यायाने वागणारा

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

उभे उत्तर : १.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९.मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा ओझर येथे संपन्न

## वकील व्यवसाय हे समाजकार्याचे साधन-न्यायमूर्ती आरिफ सा. डॉक्टर

पुणे (दै. संध्या) :

समाजातील प्रत्येक घटकांना न्याय मिळवून देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे वकिली व्यवसाय हा व्यवसाय नसून समाज कार्याचे साधन आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा पुणे जिल्ह्याचे पालक न्यायमुर्ती आरिफ सा. डॉक्टर यांनी केले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती, जुन्नर आणि तालुका बार असोसिएशनमार्फत श्री विघ्नहर सांस्कृतिक भवन, ओझर ता. जुन्नर येथे भव्य विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्याच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र के महाजन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष ॲड सुजीत शेलार, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड हेमंत हडावळे, वकील संघाचे पदाधिकारी, पक्षकार आदी उपस्थित होते.

न्यायमुर्ती आरिफ सा. डॉक्टर म्हणाले, शासकीय योजनांचा नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी पुणे जिल्हा हा नेहमीच अग्रेसर राहिल्याबद्दल जिल्ह्याचा पालक न्यायमूर्ती म्हणून अभिनंदन केले.

शासनाच्यावतीने विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत असून या योजनांमुळे लोकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांना शासकीय योजनांची माहिती व लाभ देण्यासाठी आयोजित आजचा विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास व्यक्त करुन या मेळाव्याचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन न्यायमुर्ती डॉक्टर यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती आणि जुन्नर तालुका बार असोसिएशनच्यवतीने विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित केल्याबद्दल न्यायमुर्ती आरिफ सा. डॉक्टर अभिनंदन केले.

श्री. महाजन म्हणाले, खेड-राजगुरूनगर, घोडेगाव, जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना त्यांच्यासाठी असलेल्या विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा तसेच कायदेविषयक हक्कांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उदेशाने या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



समाजाच्या उन्नतीसाठी शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती व लाभ दुर्बल व वंचित घटकातील नागरिकांना देण्यासाठी अशाप्रकारे महामेळावे महत्त्वपूर्ण आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या रस्त्यांवरील वरील खड्डयामुळे होणारे मृत्यू आणि रस्ते सुरक्षेबाबत महत्वपूर्ण निकाल दिला आहे; नागरिकांच्या जीवन आणि सुरक्षिततेच्या अधिकाराचे रक्षण करणाऱ्या ऐतिहासिक निकालामध्ये नागरिकांच्या सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आली आहे.

खड्डयांमुळे होणारे नागरिकांचा मृत्यू झाल्यास ५ लाख रुपये भरपाई देण्यात यावी. जखमी झाल्यासः दुखापतीच्या तीव्रतेनुसार ५० हजार ते २ लाख ५० हजार रुपयादरम्यान नुकसान भरपाई मिळते.

नागरिकांचा मृत्यू झाल्यास मृतांच्या कायदेशीर वारसांनी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करावी. नुकसान भरपाई करिता जिल्हास्तरीय समितीकडे माहिती द्यावी. कारवाई न झाल्यास जिल्हा विधी सेवा सेवा प्राधिकरणाकडे पीडितांना किंवा कुटुबिंयाना थेट दावे दाखल केल्यास त्यांना भरपाई किंवा उपाययोजनांचा पाठपुरावा करण्यास मदत करण्यात येते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत आपआपसातील वाद समझोत्याने मिळविण्यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे १४ मार्च २०२६ रोजी जिल्ह्यातील प्रत्येक न्यायालयात आयोजन करण्यात येणार आहे. लोक न्यायालयामध्ये प्रकरण मिटल्यास न्यायालयीन शुल्क नियमाप्रमाणे परत मिळू शकते. प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. लोक न्यायालयाच्या निकालावर अपील करता येत नाही. परस्पर संमतीने निकाल झाल्याने आपआपसात कटूता कमी होण्यास मदत होऊन वेळ व पैसा दोघांचीही बचत होते. त्यामुळे अधिकाधिक पक्षकारांनी या राष्ट्रीय लोकअदालतीत सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांनी केले.

श्री. वाघमारे म्हणाले, जन कल्याणाच्या विचार करता शासनाच्या योजना, उपक्रमाचा नागरिकांना लाभ देण्यासाठी उच्च न्यायालयदेखील पुढाकार घेत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना योजनांचे देण्यासाठी लाभ आरोग्य, कृषी, ग्रामविकास, महिला व बालकल्याण, पशुसंवर्धन आदी विभागाचे स्टॉल लावण्यात आले आहे. जिल्ह्यात विद्यार्थ्यांची गुणवत्ता पूर्ण अत्याधुनिक पायाभूत सुविधांनीयुक्त 'मॉडेल शाळा' व पुणे मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र' आणि मुख्यमंत्री समृद्ध ग्राम योजना उपक्रम राबविण्यात येत आहे, असेही श्री. वाघमारे म्हणाले.

श्री. गिल्ल म्हणाले, पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस दलामार्फत वाहतूक नियमांचे पालन होण्याच्यादृष्टीने चित्रफीत प्रसारित करण्यात आली आहे. वाहतूक नियमांचे पालन करणाऱ्या सुमारे ७ हजार नागरिकांना प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. नागरिकाना कायद्याबाबत माहिती व्हावी याकरीता शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची अचूक माहिती समाजातील सर्व घटकांना झाली पाहिजे. माहिती अभावी ते लाभापासून वंचित राहतात. तसेच समाजात अनुचित प्रकार रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालय, समाजातील प्रतिनिधी आणि कुटुंबात जनजागृती करण्याची मोठया प्रमाणात गरज आहे, याकरीता समाजातील सर्व घटकांनी पुढे यावे, असे आवाहन श्री. गिल्ल यांनी केले.

कार्यक्रमात न्यामूर्ती डॉक्टर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात लाभ देण्यात आले. यावेळी मान्यवरांनी स्टॉलला भेटी देवून योजनांची माहिती घेतली. सिंहगड विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'बालविवाह व हुंडाबळी मुक्ती' या विषयावर जनजागृतीपर पथनाट्याचे सादरीकरण केले. अॅड. शेलार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर अॅड. हडावळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लक्ष्मीनगर पोलिसांची प्रभावी कारवाई; वाहन तोडफोडीच्या 22 गुन्ह्यांचा उलगडा

पुणे (दैनिक संध्या) : येथील येरवडा परिसरातील लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनहद्दीत वारंवार घडणाऱ्या वाहन तोडफोडीच्या घटनांवर पोलिसांनी प्रभावी कारवाई करत तब्बल २२ गुन्ह्यांचा उलगडा केला आहे. या कारवाईमुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणात सुलतान रिजवान शेख (वय २०, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) याला ताब्यात घेण्यात आले असून चौकशीदरम्यान त्याच्याविरुद्ध पुणे शहरातील विविध भागांतील एकूण २२ गुन्हे उघडकीस आले आहेत. विशेष म्हणजे, ज्या परिसरात आरोपीने वाहनांची तोडफोड केली होती, त्याच ठिकाणी पोलिसांनी त्याची दिंड काढून नागरिकांमध्ये कायद्याबाबत जनजागृती केली. या कृतीमुळे गुन्हेगारांवर वचक बसण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे व संशयास्पद हालचालींबाबत त्वरित पोलिसांना कळवण्याचे आवाहन केले आहे. पोलिस प्रशासन नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सदर प्रकरणाचा पुढील तपास लक्ष्मी नगर पोलीस स्टेशनमार्फत सुरू आहे.





### फोनपेचा पुणे व पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांशी संयुक्त उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित करण्यासाठी फोनपेने पिंपरी-चिंचवड आणि पुणे सायबर क्राईम पोलिसांसाठी विशेष 'सायबर क्राईम ट्रेनिंग वर्कशॉप' आयोजित केले. या उपक्रमाची नुकतीच यशस्वी सांगता झाली असून, डिजिटल पेमेंट प्रणाली आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणा यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे. या कार्यक्रमाला पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे (IPS), पोलीस उपायुक्त शिवाजी पवार आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे यांच्यासह सायबर विभागातील अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान व्यवहारांचा प्रवाह, एस्क्रो खात्यांमधील निधीची हालचाल, विविध खात्यांतून फिरवले जाणारे पैसे आणि त्यांचा डिजिटल मागोवा घेण्याच्या तांत्रिक पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सध्या 'डिजिटल अरेस्ट', बनावट ट्रेडिंग ॲप्स आणि गुंतवणूक घोटाळ्यांचे प्रमाण वाढले असून, सायबर गुन्हेगार 'सोशल इंजिनीअरिंग', कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि 'डीपफेक' तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जाळ्यात ओढत आहेत. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हा घडल्यानंतरच्या 'गोल्डन अवर'मध्ये संशयित खाती तात्काळ गोठवण्यासाठी फोनपेच्या विशेष पोर्टलचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकही देण्यात आले. फोनपेचे ट्रस्ट अँड सेफ्टी विभाग प्रमुख सत्यजित कुमार म्हणाले, "भारताच्या डिजिटल पेमेंट क्रांतीचे यश नागरिकांच्या विश्वासावर अवलंबून आहे. प्रत्येक व्यवहार सुलभ आणि सुरक्षित असावा, ही आमची भूमिका आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांसोबतचे सहकार्य अधिक मजबूत डिजिटल सुरक्षा व्यवस्था उभारण्यास मदत करेल." सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे म्हणाले, "डिजिटल व्यवहारांचा वेग वाढत असताना सायबर सुरक्षाही तितकीच मजबूत असणे गरजेचे आहे. फोनपेच्या सहकार्यामुळे निधीचा प्रवाह आणि व्यवहारांची साखळी समजून घेणे अधिक सोपे झाले आहे. त्यामुळे तपास अधिक जलद आणि प्रभावी होईल." वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे म्हणाल्या, "सायबर गुन्ह्यांमध्ये पहिल्या तासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. फोनपेच्या तांत्रिक सहकार्यामुळे संशयित खाती तत्काळ गोठवणे आणि पीडितांना मदत करणे अधिक सुलभ होईल. या प्रशिक्षणामुळे आमच्या तपास क्षमतेत निश्चितच वाढ झाली आहे." या संयुक्त उपक्रमामुळे सायबर गुन्ह्यांवर आळा बसण्यास मदत होणार असून, नागरिकांचे डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## श्री. लोकेश चंद्र यांचा 'नॅशनल लीडरशिप अवॉर्ड २०२६' ने गौरव

पुणे (दै. संध्या) :

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांचा शुक्रवारी (दि. २७) आयोजित यंदाच्या नॅशनल लिडरशिप परिषदेमध्ये 'इंडियाज बिझीनेस लिडर ऑफ एक्सलेन्स अवॉर्ड-२०२६' या पुरस्काराने गौरव करण्यात आला. मुंबई येथील स्टॉक एक्सचेंजच्या इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉलमध्ये टाइम्स एस्पायर या संस्थेच्या वतीने नॅशनल लिडरशिप शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत संस्थात्मक उत्कृष्ट नेतृत्व, पर्यावरण व शाश्वत ऊर्जा, नाविन्यपूर्ण उपक्रम, कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान आदींवर सादरीकरण व चर्चा करण्यासाठी देशातील खासगी व सरकारी विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांना जाहीर झालेला



पुरस्कार त्यांच्यावतीने संचालक (संचालन) श्री. सचिन तालेवार, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांनी स्वीकारला. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिर्वतन सुरु आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. यामध्ये महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ८२ गिगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत.

## उपमहापौरांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य सेवांचा आढावा

पुणे (दै. संध्या) :

शहरातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व दर्जेदार करण्याच्या उद्देशाने उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीस अति. आयुक्त पवनीत कौर, आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोऱाडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे, परिमंडळ वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक पखाले, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेमलता घाटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गुणेश बागडे तसेच विद्युत व भवन विभागाचे अभियंते आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत शहरातील विविध महापालिका रुग्णालयांमधील प्रलंबित कामे, सेवा विस्तार, आवश्यक दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आरोग्य सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. बोपोडी येथील संजय गांधी रुग्णालय हे संपूर्णपणे महापालिकेमार्फत चालवून अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी रुग्णालय म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कै. द्रोपदाबाई मुरलीधर खेडेकर रुग्णालय येथे डोळे व दंत उपचार सुविधा सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. औंध रोडवरील कै. बाबुराव गेनबा शेवाळे रुग्णालय या इमारतीचा संपूर्ण उपयोग करून आवश्यक देखभाल व दुरुस्ती करत आरोग्य सेवांचा विस्तार करण्याचे ठरविण्यात आले. तसेच औंध कुटी रुग्णालय येथे नूतनीकरण करून पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याचे निर्देश देण्यात आले.

गोरगरिब व सर्वसामान्य नागरिकांना सुलभ, परवडणारी व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून ठोस पावले उचलण्यात येत असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीनंतर उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी संबंधित विभागांना सर्व बाबींवर प्राधान्याने तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच दुपारी १.३० ते ३ या वेळेत संबंधित अधिकाऱ्यांसमवेत वरील सर्व रुग्णालयांना प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन सुधारणा कामांना त्वरित प्रारंभ करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

## क्रीडा सवलतीचे प्रस्ताव १५ एप्रिलपर्यंत करावेत ऑनलाईन सादर

पुणे (दै. संध्या) :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

मागील वर्षाप्रमाणे यंदाही निकाल लवकर जाहीर करण्याच्या दृष्टीने क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांचेकडून विभागीय मंडळाकडे केवळ ऑनलाईन पद्धतीनेच सादर



करण्यात येणार आहेत. यासाठी राज्य शासनाच्या आपले सरकार पोर्टल या संकेतस्थळावर https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकद्वारे प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित प्रस्ताव दि. १५ एप्रिल २०२६ पर्यंत स्वीकारण्यात येतील.

विद्यार्थी, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विहित कागदपत्रांसह अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांचेकडे सादर करावेत. ऑनलाईन प्रणालीसंदर्भातील सविस्तर कार्यपद्धती User Manual मध्ये नमूद करण्यात आली असून त्यानुसार प्रस्ताव भरावेत. प्राप्त प्रस्तावांची छाननी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे.

पोर्टलवर अर्ज भरताना तांत्रिक अडचण आल्यास १८००१२०८०४० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच क्रीडा गुण प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात इतर अडचणी असल्यास जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पुणे येथील श्रीमती अश्विनी हत्तरगे (७३८७८८०४२७), श्री. दादासाहेब देवकते (९९२३९०२७७७), श्री. शिवाजी कोळी (७०२०३३०४८८) व श्रीमती ज्योती सुर्यवंशी (७७९८३०२४८१) यांच्याशी संपर्क साधावा. विहित कागदपत्रे सादर न केल्यास प्रस्ताव अपात्र करण्यात येतील. अशा वेळी त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने पुन्हा सादर करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी, शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांतील क्रीडा शिक्षक, शिक्षक मुख्याध्यापक व प्राचार्य यांची राहील. त्रुटींबाबतची माहिती संबंधितांना ऑनलाईन प्रणालीद्वारे कळविण्यात येईल. मुदतीनंतर कोणतेही प्रस्ताव ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार नाहीत.

विहित मुदतीत कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे श्री. जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.



## दोन विद्यार्थ्यांना परदेशात नोकरीची संधी

पुणे (दै. संध्या) :

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय येथील फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातील विद्यार्थिनी ऋचा ऋषिकेश सातपुते व विद्यार्थी आदित्य हेमंत काळे यांना परदेशात नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. ऋचा सातपुते हिची इंग्लंडमधील टर्क्स अँड केकोस बेटावरील 'टक्स अँड केकस' येथे नियुक्ती झाली असून, आदित्य काळे याची कॅलिफोर्निया येथील मर्चंट नेव्हीतील 'व्हिक्टरी बे' या जहाजावर निवड झाली आहे. दोघेही मध्यमवर्गीय कुटुंबातील असून स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर शिक्षण पूर्ण करून त्यांनी ही यशस्वी झेप घेतली आहे. महाविद्यालयातील फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमातून आतापर्यंत दहा विद्यार्थी विविध देशांत शिक्षण व नोकरीसाठी गेले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करून जागतिक स्तरावर संधी मिळवणे ही अभिमानाची बाब असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले.

## पेसा क्षेत्रातील पालघरमध्ये ५६९ शिक्षकांना शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती

पुणे (दै. संध्या) :

राज्यातील पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेत महत्त्वाची घडामोड घडली असून पालघर जिल्ह्यातील ५६९ शिक्षकांना तीन वर्षांसाठी 'शिक्षणसेवक' म्हणून नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. २६ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषदेकडून यासंदर्भातील आदेश निर्गमित करण्यात आले. ५ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गातील रिक्त पदांसाठी आदिवासी उमेदवारांना तात्पुरत्या



मानधन तत्वावर नियुक्त्या देण्यात आल्या होत्या. त्यापैकी शिक्षक संवर्गातील ५६९ उमेदवारांना आता नियमित शिक्षणसेवक पदावर तीन वर्षांसाठी संधी मिळाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ६ ऑक्टोबर २०२५ रोजी राखीव प्रवर्गातील ५० टक्के जागा भरण्यास राज्य व जिल्हा परिषदांना परवानगी देत भरती प्रक्रियेतील अडथळा दूर केला होता. त्यानंतर अवमान याचिका क्र. ६४८७२/२०२५ वर १७ नोव्हेंबर २०२५ रोजी आदेश देण्यात आले. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी शासन निर्णय काढून भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा केला.

दरम्यान, कायम नियुक्तीच्या मागणीसाठी पालघरमधील आदिवासी उमेदवारांनी १८ फेब्रुवारीपासून मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू केले होते. 'ट्रायबल फोरम'कडूनही शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात आला.

राज्यभरातील पेसा भरती प्रक्रियेत काही संवर्गातील ३,६९३ उमेदवारांचा निकाल तयार असूनही जाहीर झालेला नाही. २,४८८ उमेदवारांचा निकाल जाहीर झाला असला तरी नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत. राज्यातील ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर या १३ आदिवासीबहुल जिल्ह्यांपैकी केवळ पालघरमध्येच ८४८ तात्पुरत्या शिक्षकांपैकी ५६९ जणांना शिक्षणसेवक पदावर नियुक्ती मिळाली आहे. उर्वरित २७५ शिक्षक प्रतीक्षेत असून इतर १२ जिल्ह्यांत प्रक्रिया ठप्प असल्याची माहिती आहे. 'राज्यातील आदिवासीबहुल १३ जिल्ह्यांत वर्षानुवर्षे भरती रखडली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून आदिवासी बेरोजगारांना न्याय द्यावा,' अशी मागणी ट्रायबल फोरम कोकण विभागाचे कार्याध्यक्ष सुनील झळके यांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## आयआयएमएस व आयबीएमआर चा वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

पिंपरी (दैनिक संध्या) : जीवनात केवळ यशालाच महत्व नसून अपयशातून देखील आपल्याला हार जीत स्वीकारण्याची शिकवण खेळातून मिळते यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्याने एखाद्या क्रीडा प्रकाराचा सराव करायला हवा असे आवाहन यशस्वी संस्थेचे मनुष्यबळ व्यवस्थापन विभागाचे प्रमुख श्रीकांत मिरजकर यांनी व्यक्त केले. यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) आणि इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च (आयबीएमआर) च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या क्रीडा महोत्सवाच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले होते. अभ्यासासोबतच खेळांमधील सक्रिय सहभाग हा विद्यार्थ्यांचे सुदृढ व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी आवश्यक असतो,असे डॉ. मुंढे यांनी यावेळी सांगितले.यंदाच्या क्रीडा महोत्सवात क्रिकेट, कॅरम व बुद्धिबळ या प्रमुख तीन क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांमध्ये विद्यार्थी- विद्यार्थिनींनी उत्साही सहभाग नोंदवला. अजय बेद्रे,समर्थ चव्हाण,प्रथमेश बनसोडे,यश कोतुळकर,ओंकार बोबडे,अपर्णा मिसाळ,अनुष्का काळे,ओम सोनवणे, हेमंत फुलमाळी,अविनाश पाटील,सुमित गुरव,श्रीकांत ईबीटीदार इब्तीदार या विद्यार्थी प्रतिनिंधीनी सूत्रसंचालन आदी जबाबदाऱ्या सांभाळल्या. तर डॉ. वंदना मोहंती, डॉ. अश्विनी ब्रम्हे,डॉ.सचिन मिसाळ,डॉ. पुष्पराज वाघ,प्रो. गंगाधर डुकरे,प्रा. नितीन गणेशर,प्रा. तुषार कथाणे आदी प्राध्यापक वर्गाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच क्रीडा महोत्सवाचे समन्वयन केले.

## रमजान एनर्जी गाइड: उपवास दरम्यान सक्रिय कसे राहावे : ऋतिका समद्दार



पुणे (दैनिक संध्या) : पवित्र रमजान महिना आध्यात्मिकता, चिंतन आणि समाजभावनेचा काळ आहे. ३० दिवस सकाळपासून संध्याकाळपर्यंत उपवास ठेवणे शारीरिकदृष्ट्या थकवणारे वाटू शकते, विशेषतः मातांसाठी, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आणि दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या व्यावसायिकांसाठी. दिवसभर सतत ऊर्जा टिकवण्यासाठी ही गुरुकिल्ली म्हणजे विचारपूर्वक नियोजित सहरी. सहरीमध्ये लक्ष संतुलित आणि हळूहळू ऊर्जा देणाऱ्या अन्नावर असावे, जे दिवसभर ताकद टिकवून ठेवण्यास मदत करते आणि थकवा टाळतो. पोषक घटकांनी भरलेले अन्न शरीराला सतत ऊर्जा देते आणि लांब वेळा पोट भरलेले असल्याची भावना निर्माण करते. दुसरीकडे, दिवसाची सुरुवात तळलेले किंवा खूप गोड अन्न खाल्ल्यास ऊर्जा सुरुवातीला वाढते पण नंतर अचानक कमी होते. यामुळे दिवस वाढत जाईल तसेच थकवा आणि तहान अधिक जाणवू शकतो. सहरीमध्ये विचारपूर्वक आणि पौष्टिक अन्न निवडल्यास उपवास ठेवणे सोपे आणि ऊर्जावान वाटू शकते. दिवसभर सतत ऊर्जा टिकवण्यासाठी या पाच अन्नपदार्थांना आपल्या सहरीमध्ये समाविष्ट करा: बदामा मध्ये व्हिटामिन B2, व्हिटामिन E, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस मुबलक प्रमाणात असतात, जे अन्नातून ऊर्जा मिळवण्याच्या प्रक्रियेत मदत करतात. हे शरीराला निरोगी आणि टिकाऊ ऊर्जा देतात, ज्यामुळे आपण दिवसभर सक्रिय राहू शकता. सहरीमध्ये कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करणे, मग त्यांना रात्रीभर भिजवून खाल्लं किंवा स्मूदीमध्ये घालून खाल्लं, लांब वेळा उपवास ठेवताना ऊर्जा स्तर स्थिर ठेवण्यास मदत करू शकते. दूध किंवा वनस्पतीजन्य पर्यायांसह तयार केलेले ओट्स जटिल कार्बोहायड्रेट आणि फायबर देतात. हे ऊर्जा हळूहळू जारी करण्यास मदत करते, ज्यामुळे पोट लांब वेळा भरलेले राहते आणि दुपारी येणाऱ्या थकव्यापासून बचाव होतो.




## नेटफ्लिक्सने ‘हॅलो बच्चो’चा ट्रेलर रिलीज केला : शिक्षकाची प्रेरणादायी कहाणी

पुणे (दैनिक संध्या) : हॅलो बच्चो–हा फक्त वर्गात उच्चारला जाणारा शब्द नाही, तर नवीन विचार आणि प्रेरणेचे प्रतीक आहे. नेटफ्लिक्सने आपल्या नव्या सिरीजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. ही सिरीज शिक्षक अलख पांडे यांच्या खास प्रवासावर आधारित आहे, ज्यांचा प्रभाव केवळ वर्गापुरता मर्यादित राहिला नाही, तर भारतातील अनेक विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत आणि मनापर्यंत पोहोचला आहे. 6 मार्च रोजी प्रीमियर होणारी ही सिरीज अशा विद्यार्थ्यांची कथा सांगते ज्यांनी आपली स्वप्ने कधीही सोडली नाहीत. त्यांच्या शिक्षकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्याच विश्वासामुळे त्यांना पुढे जाण्याची ताकद आणि धैर्य मिळाले. एका साध्या वर्गातील छोट्या सुरुवातीपासून सुरू झालेली ही कथा पुढे एक मोठी चळवळ बनते. ही पहल शहरांपासून गावांपर्यंत आणि छोट्या गल्लीबोळांपर्यंत पोहोचते. ट्रेलरमध्ये विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या कथा दाखवल्या आहेत, पण त्यांना एकत्र जोडणारे एकच स्वप्न आहे. एका मुलाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो, एका मुलीला शिक्षण पूर्ण करण्यासाठी समाजाच्या अपेक्षा पेलाव्या लागतात, तर आणखी एका मुलाला क्रिकेटचे स्वप्न बाजूला ठेवून घरची जबाबदारी सांभाळावी लागते. त्यांच्या कथा सांगतात की शिक्षण हे काही मोजक्या लोकांचे विशेषाधिकार नाही, तर प्रत्येक मुलाचा हक्क आहे. योग्य मार्गदर्शन आणि विश्वास मिळाला तर शिक्षण आयुष्य बदलू शकते. प्रतिश मेहता यांच्या दिग्दर्शनाखाली ही सिरीज बनवण्यात आली आहे. मुख्य भूमिका विनीत कुमार सिंग यांनी साकारली असून, विक्रम कोचर आणि गिरीजा ओक गोडबोले यांच्यासह इतर कलाकारही आहेत. सतेन्द्र सोनी, सोनू कुमार यादव, अंशुल डोगरा, समता सुदिक्षा, वरुण बुद्धदेव आणि नमन जैन यांनीही प्रभावी अभिनय केला आहे. या सर्वांनी पाच विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या आणि प्रेरणादायी कथा साकारल्या आहेत. हे विद्यार्थी प्रत्येक अडचणीचा सामना करत आपल्या स्वप्नांकडे ठामपणे वाटचाल करतात. ही सिरीज अभिषेक यादव यांनी तयार केली असून, अंकित यादव, वर्नाली आणि संदीप सिंग यांनी कथा लेखन केले आहे.

# लोणी काळभोर मुळा-मुठा नदीपात्रातील कचऱ्याची आग कायम

**परिसरात विषारी धुराचे मोठे लोट; श्वसनाचा त्रास झाल्याने विद्यार्थी रुग्णालयात; परिसरात भीतीचे वातावरण**

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**



परिसरातील मुळा-मुठा नदीच्या पात्रात अवैधरित्या टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याला शुक्रवारी सकाळी भीषण आग लागल्याची घटना समोर आली. या आगीमुळे परिसरात प्रचंड विषारी धुराचे लोट पसरले असून श्वास घेण्यास त्रास झाल्याने एमआयटी शिक्षण संकुलातील काही विद्यार्थ्यांना शुक्रवारी मध्यरात्री जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले. एमआयटी शिक्षण संकुलातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न शनिवारीदेखील सुरू होते.

एमआयटी शैक्षणिक संकुलात सध्या राज्यासह देश-विदेशातून आलेले जवळपास २०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी जवळपास ५,००० विद्यार्थी व १,००० कर्मचारी शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वास्तव्यास आहेत. नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेली आग अग्निशमन दलाने शुक्रवारी दिवसभर प्रयत्न करूनही विझवता आली नाही. त्यामुळे रात्री ती आणखी वाढून विषारी धुराचे प्रचंड मोठे लोट परिसरात जमा झाले. यामुळे वसतिगृहातील तसेच परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, घसा बसणे इत्यादी त्रास झाला. तसेच, शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांना विषारी धुरामुळे शुक्रवारी मध्यरात्री अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करण्यात आले. विषारी वायूच्या लोटांमुळे परिसरातील दृश्यमानता प्रचंड कमी झाली. याचा परिणाम शनिवारी पहाटे पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतुकीवरही झाला. तसेच, या विषारी धुराच्या लोटांमुळे परिसरातील एका कंपनीच्या कर्मचाऱ्यांना व एमआयटी शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांना शनिवारी सुट्टी द्यावी लागली. शनिवारी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीचे सरपंच, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, पोलिस पाटील व स्थानिक अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.

स्वच्छ भारत मोहिमेच्या पार्श्वभूमीवर देशभरात स्वच्छता आणि नदी संवर्धनासाठी प्रयत्न सुरू असताना, लोणी काळभोर येथे मात्र पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर थेट कचरा टाकून तो जाळण्याचा प्रकार अनेकदा उघडकीस आला आहे. लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या पुणे शहराला लागून असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायती आहेत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतींच्या हद्दीत दररोज मोठ्या प्रमाणात ओला व सुका कचरा निर्माण होतो. परंतु या ठिकाणी कचरा संकलनासाठी जागा तसेच कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तांत्रिक प्रकल्प आजमितीस उपलब्ध नाही. त्यामुळे नाइलाजास्तव दररोज सुमारे ३० ते ३५ ट्रॉलींहून अधिक कचरा थेट मुळा-मुठा नदीपात्रात टाकला जातो. परिणामी, नदीपात्रात आता कचऱ्याचे मोठे ढीग तयार झाले असून परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यात आता या कचऱ्याला सातत्याने आग लागण्याचे प्रकार वाढत असल्याने वायुप्रदूषणातही कमालीची वाढ झाली असून परिसरातील नागरिकांना श्वास घेणेही कठीण झाले आहे.

नदीपात्रात कचरा टाकल्यामुळे केवळ वायुप्रदूषणच नव्हे, तर जलप्रदूषणही वाढत असून मुळा-मुठा नदीचे पाणी दूषित होत आहे. त्यामुळे जलचरांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे.

> लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती या दोन्ही ग्रामपंचायतींनी यापूर्वीच अनेक वेळा घनकचरा व्यवस्थापनासाठी वेगळी जागा मिळावी यासाठी जिल्हा परिषद व जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवले आहेत. तो अद्यापही शासन दरबारी प्रलंबित आहे. शासनाकडून दोन्ही ग्रामपंचायतींना तातडीने जागा मिळाल्यास त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारता येईल. त्यामुळे मुळा-मुठा नदीपात्रात थेट कचरा टाकणे बंद होईल व पर्यावरणाचा ऱ्हास थांबून परिसरातील नागरिकांचे आरोग्य आबाधित राहील.
>
> **- चित्तरंजन गायकवाड, माजी सरपंच, कदमवाकवस्ती ग्रामपंचायत**

> पुणे शहराची जीवनवाहिनी असलेल्या मुळा-मुठा नदीपात्रात थेट कचरा टाकणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. नदीपात्रात कचऱ्याचे डोंगर उभे असून त्यास सातत्याने आग लागण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे विषारी धुराचे लोट तयार होऊन विद्यापीठातील विद्यार्थ्यांना श्वसनाच्या समस्या जाणवत आहेत. जिल्हा प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने हस्तक्षेप करावा. नदीपात्रात अवैधरित्या थेट कचरा टाकणे त्वरित थांबवण्यात यावे. विद्यार्थी व परिसरातील नागरिकांचे आरोग्य राखण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायतींच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने जागा उपलब्ध करून द्यावी.
>
> **- डॉ. महेश चोपडे, कुलसचिव, एमआयटी एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे.**

## होळीसाठी झाडे कापलीत तर १ लाखांचा दंड अन् कायदेशीर कारवाई होणार

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

होळी सणाच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेने झाडांच्या फांद्या तोडणे आणि बेकायदेशीर वृक्षतोडीविरुद्ध कडक इशारा जारी केला आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, परवानगीशिवाय कोणतेही झाड तोडणे, जाळणे किंवा नुकसान करणे हा कायदेशीर गुन्हा आहे. महाराष्ट्र नागरी क्षेत्र वृक्ष संवर्धन कायदा २०२१ अंतर्गत, परवानगीशिवाय झाड तोडल्यास संबंधित झाडाच्या किमतीएवढा दंड आकारला जाऊ शकतो. जो कमाल १ लाख रुपयांपर्यंत असू शकतो. या उत्सवादरम्यान काही भागात होळी जाळण्यासाठी झाडांच्या फांद्या तोडण्याच्या घटना घडल्या आहेत. ज्या थांबवण्यासाठी यावेळी विशेष देखरेख ठेवली जाईल. महापालिका प्रशासनाने वृक्ष प्राधिकरण आणि संबंधित अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. बेकायदेशीर वृक्षतोड किंवा फांद्या तोडल्याची तक्रार आल्यास संबंधित व्यक्तीविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई केली जाईल. प्रशासनाने नागरिकांना पर्यावरणपूरक पद्धतीने होळी साजरी करण्याचे आणि हिरवळीचे नुकसान टाळण्याचे आवाहन केले आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, शहराच्या पर्यावरणीय संतुलनासाठी झाडांचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणताही निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही.

## महाराष्ट्रात शेतकऱ्यांसाठी तात्काळ कर्जमाफीची मागणी; ई-मेलद्वारे निवेदन

**नीरा (दै. संध्या) :**



राज्यातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले असून सर्वसमावेशक कर्जमाफीचा निर्णय तातडीने जाहीर करावा, अशी मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठवून शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणींकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

निवेदनात अवकाळी पाऊस, दुष्काळी परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती आणि शेतीमालाला सातत्याने हमीभाव न मिळणे यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या पिचला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कर्जमाफीबाबत शासनाकडून स्पष्ट धोरण जाहीर न झाल्याने ग्रामीण भागात संभ्रम व अस्वस्थता वाढत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे मार्च अखेरीस पीक कर्जाची परतफेड करण्यासाठी बँकांकडून वसुलीचा तगादा सुरू होतो. मात्र कर्जमाफीबाबत ठोस निर्णय नसल्याने शेतकरी मानसिक तणावाखाली असून कोणते कर्ज माफ होणार, निकष काय असणार याबाबत स्पष्टता नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

नियमित कर्जफेड करणारे आणि थकबाकीदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करत मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच सकारात्मक निर्णय जाहीर केल्यास ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या परतफेडीच्या दडपणातून दिलासा मिळू शकतो, असे सांगण्यात आले आहे.

कर्जवसुलीच्या पार्श्वभूमीवर अनेक शेतकरी कर्ज भरण्याच्या मानसिकतेत नसल्याने विविध कार्यकारी सोसायट्यांवरही आर्थिक ताण वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शून्य टक्के व्याज योजनेचा लाभ घेण्यातही अडचणी येत असून शासनाच्या निर्णयातील विलंबामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

शासनाने आश्वासनांपुरते न राहता कर्जमाफीबाबत स्पष्ट व पारदर्शक भूमिका जाहीर करून शेतकऱ्यांमधील संभ्रम दूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मेंढपाळ पालकांचा मुलगा बनला एसबीआयमध्ये ज्युनिअर असोसिएट

**संघर्षातून यशाची प्रेरणादायी कहाणी ; सर्वस्तरातून अभिनंदन**

**नीरा (दै. संध्या) :**

प्रत्येक यशामागे संघर्षाची एक कहाणी दडलेली असते. प्रतिकूल परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि मर्यादित साधनसामग्री यांवर मात करत एका मेंढपाळ कुटुंबातील मुलाने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मोठे यश मिळवले आहे. अर्जुन बिरा महानवर याची भारतीय स्टेट बँकेत (SBI) ज्युनिअर असोसिएट (JA) पदावर निवड झाली आणि मेंढपाळांच्या झिरिपवस्तीत आनंद साजरा झाला. तर नीरा येथे पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा दिगंबर दुर्गाडे व मित्र परिवाराच्या वतीने महानवर यांचे अभिनंदन करण्यात आले. पुरंदर तालुक्याच्या गुळूंचे कर्नलवाडी येथील झिरिपवस्तीतील अर्जुनचे आई-वडील पारंपरिक पद्धतीने मेंढ्या राखून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. ग्रामीण आणि साध्या वातावरणात वाढलेल्या अर्जुनने लहानपणापासूनच शिक्षणाला प्राधान्य दिले. घरची परिस्थिती मर्यादित असतानाही त्याने आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवले. अनेक अडचणी, अभाव आणि संघर्ष असूनही त्याने हार मानली नाही.

अर्जुनचे प्राथमिक शिक्षण पुरंदर तालुक्यातील झिरिपवस्तीच्या पुणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण गुळूंचे येथील ज्योतिर्लिंग हायस्कूलमध्ये झाले. तर, महाविद्यालयीन शिक्षण सासवडच्या वाघेरे महाविद्यालय येथे झाल्याने पुण्यात बँक क्षेत्रातील परिक्षा देत होते.

गेली अडीच तीन वर्ष सातत्याने प्रयत्न करत राहिले व आज शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी रोजी एसबीआय मध्ये ज्युनिअर असोसिएट पदी निवड जाहीर झाल्याने मेंढपाळ वस्तीत आनंदोत्सवात नाहली. शनिवार नीरा येथील शिवस्वराज पतसंस्थेत अर्जुन महानवर यांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा दिगंबर दुर्गाडे, संस्थेचे चेअरमन पृथ्वीराज निगडे, यांनी त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य प्राजक्ता दुर्गाडे, पुरंदर पंचायत समितीच्या राष्ट्रवादी गटनेत्या स्मिता निगडे, पंचायत समितीच्या सदस्या मोनिका कांबळे, उत्तम धुमाळ, दिलिप थोपटे, संचालक भरत निगडे, दत्तात्रय काकडे, लक्ष्मण वाघापूरे, अशोक पाटोळे, बबन भोसले यांसह सभासद उपस्थित होते. अर्जुन अभ्यास करत असताना त्याचे पालक मेंढ्या चारत होते. अर्जुनही शालेय जिवनात मेंढ्या संभाळत.



कुटुंबाच्या कष्टातून आणि स्वतःच्या जिद्दीच्या बळावर अर्जुनने बँकिंग क्षेत्रातील स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केली आणि अखेर एसबीआयमध्ये ज्युनिअर असोसिएट पद मिळवून आपल्या कुटुंबाचे आणि गावाचे नाव उज्ज्वल केले.

> त्याच्या यशाने एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. यश ठरवणारी गोष्ट म्हणजे तुमची पार्श्वभूमी नव्हे, तर तुमची मेहनत, चिकाटी आणि स्वप्नांवरचा विश्वास. अर्जुनची ही यशोगाथा अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अर्जुन बीरा महानवर याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्रात व्यसनमुक्तीचे वारे करुन होळीला नमन

**मुंबई (दै. संध्या) :**




सामाजिक न्याय विभाग, समाज कल्याण आयुक्तालय, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर - उपनगर व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला आहे.उत्सव आला की व्यसन आले. होलिकेला नमन केले व्यसनांचे दहन या व्यसनांची होळी या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ दुपारी २.३०ते ५.०० वाजेपर्यंत १३८ बेस्ट बस स्टॉप जवळ, कॅपिटल सिनेमा समोर, बेस्ट बस डेपो, सिएसएमटी (प), मुंबई येथे करण्यात आले होते. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, मुंबई शहर प्रसाद खैरनार यांनी व्यसनमुक्तीसाठी उचलेले हे पाऊल स्वागतार्ह असल्याचे त्यांनी दिलेल्या संदेशात म्हटले होते. कारण व्यसनांना अटकाव करायचा असेल तर सुरुवात तंबाखू पासून करावी लागेल. यावेळी दारु, गुटखा, सिगारेट, अमली पदार्थ, गांजा, अफू, गर्द, ड्रग्ज, चरस यांची वेष्टणे,आवरणे या व्यसनांचा आठ फुटी भव्य राक्षसाचे प्रतिकात्मक दहन करण्यात आले. जेणेकरुन समाजातील व्यसनांचा समूळ नाश होईल व निर्व्यसनी मुंबई व महाराष्ट्राचे स्वप्न पुर्ण होईल. कार्यक्रमाची सुरुवात अपुनको नको लिमिट, लिकर,टोबँको, ड्रग्ज या व्यसनमुक्तीवरील प्रजापिता ब्रम्हकुमारीज यांच्या पथनाट्याने समुदायांत प्रबोधन घडवून आणले. आपण करित असलेल्या व्यसनामुळे

जखडलेल्या राक्षसाने आपल्या मुसक्या आवळल्याचे चित्रण यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यातुन दाखविण्यात आले.

व्यसनांच्या या राक्षसाभोवती व्यसनांचे दुष्परिणाम दर्शविणारी पोस्टर्स प्रदर्शनी लोकांचे लक्ष वेधुन घेत होती. व त्यातुन व्यसनांचा आयुष्यावर किती घातक परिणाम होतो व त्यापासुन परावृत्त राहुन आनंदी जिवन जगण्याचा अनमोल सल्ला उपस्थितांना मिळाला. वाचा विचार करा आणि निर्व्यसनी महाराष्ट्र निर्माण करण्याच्या संकल्पात सहभागी व्हा या पत्रकांचे वाटप यावेळी करण्यात आले.नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी मार्गदर्शन करताना व्यसन हा मानसिक, शारिरीक व कौटुंबिक आजार आहे व तो दूर होऊ शकतो. एखाद्या माणसाला व्यसन कोणते आहे व ते किती आहे यावर त्याचे उपचार अवलंबून असतात. आपणही उपचार करुन बरे होऊ शकता त्यामुळे स्वतः व ईतरांना निर्व्यसनी करण्यासाठी नशाबंदी मंडळात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले व उपस्थित जनसमुदायाला निर्व्यसनी राहण्याचा संकल्प दिला. मुंबई येथे होणाऱ्या या होळीच्या अनोख्या कार्यक्रमास स्थानिकांचा उस्फुर्त प्रतिसाद होता.याच प्रकारच्या होळीच्या कार्यक्रमाचे आयोजन संपुर्ण महाराष्ट्रात करण्यात आले असुन नुसतेच वरील व्यसने नव्हे तर सध्याच्या दैनंदिन जिवनात असणारी सोशल मिडियातील फेसबुक, व्हॉट्सअप, व्टिटर, इंस्टाग्राम यासारख्या व्यसनांना पुढील काळात गंभिरतेने सामोरे जावे लागणार आहे त्यामुळे अशा व्यसनांचे ही दहन करावे असे आवाहन उपस्थितांना सरचिटणीस यांनी केले.

> व्यसनांच्या राक्षसाचे प्रतिकात्मक दहन मंडळाचे उपाध्यक्ष एकनाथ तांबवेकर, सरचिटणीस वर्षा विद्या विलास, चिटणीस अमोल स. भा. मडामे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था बोरिवली चे प्राचार्य, रंगारी शिल्पनिदेशक सुनिल दहिवलकर, लाला लजपत राय महाविद्यालयाचे रा. से. यो. चे विद्यार्थी, कार्यकर्ते उपस्थित जनता यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समाजातील व्यसनांना बदनाम करण्यासाठी उपस्थितांनी व्यसनांच्या विरोधात घोषणा व बोंबा मारल्या अशी माहिती मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### सांगवीत पवनाथडी जत्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ झणझणीत मराठमोळ्या जेवणाची मेजवानी; हस्तकला, खरेदी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत

दापोडी (दैनिक संध्या) : अनेक शोभेच्या वस्तू, पारंपरिक आधुनिक कृत्रिम दागिने, हस्तकलेच्या बॅगा, पर्स, गृहोपयोगी वस्तू, उन्हाळी पदार्थ, विविध मसाले, लोणचे, पापड, चटण्या नाश्त्याचे विविध पदार्थ व जेवणासाठीही अस्सल मराठमोळे, शाकाहारी, मांसाहारी पदार्थ अशा वैविध्यपूर्णतेने पवनाथडी जत्रा सजली आहे. या जत्रेत झणझणीत जेवणाचा आस्वाद घेण्यासाठी नागरिकांची झुंबड उडत आहे. सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर रविवारपर्यंत नागरिकांना जत्रेचा आनंद घेता येणार आहे. जत्रेत विविध वस्तू आणि खाद्यपदार्थांची भरपूर प्रमाणात दुकाने, स्टॉल्स आहेत. याशिवाय सायंकाळी नागरिकांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. महिलांना रोजच्या वापरासाठी लागणारे साहित्य व इतर साहित्य उपलब्ध आहे. टॉप, लेगिन्स, पर्स, बॅगांची खरेदी महिला करत आहेत. स्वतःच्या खरेदी बरोबर आपल्या घरासाठी मिरल, कॉफ पेंटिंग्स, वारली पेंटिंग्स, वाल पेंटिंग्स, की होल्डर विणलेले तोरण, ताटावरचे विणलेले रुमाल अशा महिलांनी स्वतः बनविलेल्या वस्तू व इतर गृहोपयोगी वस्तू उपलब्ध आहेत. जेवणासाठी विविध मसाले आहेत. शुभेच्छापत्रे, लहान मुलांची खेळणी, सौंदर्यप्रसाधने, सुखी मासळी विविध वस्तू जत्रेत उपलब्ध आहेत. मनसोक्त खरेदी झाल्यावर ताजेतवाने होण्यासाठी नाश्त्याचे अनेक पदार्थ खवय्यांना खुणवतात. उडीद वडा, इडली सांबर, पावभाजी, आप्पे, डोसा, सँडविच, शेगाव कचोरी आणि अगदी भेळ, वडापावसारखे विविध पदार्थ आहेत. चुलीवरच्या मराठमोळ्या झणझणीत जेवणाची लज्जत चाखण्यासाठी शाकाहारी व मांसाहारी जेवणाचे स्टॉल सज्ज आहेत.

### देहूगावात संत तुकाराम महाराज बीजसोहळ्याची भक्तिमय धामधूम

देहूगाव (दैनिक संध्या) : संत तुकाराम महाराज बीजसोहळ्यानिमित्त देहूनगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली असून, मुख्य मंदिरासह वैकुंठस्थान मंदिर आणि गाथा मंदिर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाले आहे. येत्या 5 मार्च रोजी होणाऱ्या वैकुंठगमन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहू देवस्थान संस्थानच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. सोहळ्यानिमित्त संत तुकाराम महाराज मंदिर तसेच वैकुंठस्थान मंदिर परिसराची स्वच्छता करून मंदिर आतून आणि बाहेरून धुवून चकाचक करण्यात आले आहे. मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने संपूर्ण परिसर उजळून निघाला असून, भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. विशेष म्हणजे, रोषणाईने सजलेल्या मंदिरांचे प्रतिबिंब इंद्रायणी नदीपात्रात उमटताना दिसत आहे. हे नयनरम्य दृश्य पाहण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने गर्दी करत असून, अनेकजण हे दृश्य आपल्या मोबाईलमध्ये कैद करत आहेत. दरम्यान, बीजसोहळ्याच्या निमित्ताने देहूनगरीत ठिकठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह, हरिपाठ, भजन आणि कीर्तन आदी कार्यक्रम सुरू आहेत. टाळ-मृदंगाच्या गजराने आणि हरिनामाच्या अखंड निनादाने संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगला आहे. त्यातच मंदिरांना केलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे देहूनगरीचे आध्यात्मिक सौंदर्य अधिकच खुलून दिसत आहे. बीजसोहळ्याच्या दिवशी संत तुकाराम महाराजांची पालखी सकाळी दहा वाजता वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान करते. या वेळी मोठ्या प्रमाणात वारकरी, भाविकांची गर्दी होत असल्याने पालखी मार्गस्थ होण्यापासून ते पुन्हा मंदिरात आगमन होईपर्यंत संपूर्ण मार्गावर पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये व सोहळा शांततेत आणि सुरक्षिततेत पार पडावा, यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वतीने शुक्रवारी (दि. 28) देहूगाव परिसरातील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या वेळी अप्पर पोलिस आयुक्त सारंग आव्हाड, अप्पर पोलिस आयुक्त बसवराज तेली, पोलिस उपायुक्त श्वेता खेडकर, देहूरोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विक्रम बनसोडे यांच्यासह पोलिस अधिकारी व देहू देवस्थानचे विश्वस्त उपस्थित होते. बीजसोहळ्यासाठी लाखो वारकरी देहूनगरीत दाखल होणार असल्याने सुरक्षा व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. वाहतूककोंडी टाळण्यासाठी विशेष वाहतूक आराखडा तयार करण्यात आला असून, अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा हा बीजसोहळा निर्विघ्न आणि सुरक्षित पार पाडण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी तयारी करत असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

# इतिहासात पहिल्यांदा पत्रकारांच्या अनुपस्थित बजेट सादर

## पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रभारी आयुक्त आणि पत्रकारांमध्ये वाद



पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड महापालिकेचं अर्थसंकल्प पत्रकारांच्या अनुपस्थित सादर झालं. इतिहासात पहिल्यांदाचं असं घडल्यानं आश्चर्य व्यक्त केलं जातंय. महापालिकेचे प्रभारी आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या नको त्या सुचनेमुळं पत्रकारांनी सभागृह सोडलं. तसेच प्रभारी आयुक्तांच्या पत्रकार परिषदेवर बहिष्कार टाकण्याची ही भूमिका घेतली. स्थायी समितीच्या सभागृहात अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी, नेहमीप्रमाणे पत्रकार स्थानापन्न झाले. पण पत्रकारांनी मागे जावं आणि तिथं अधिकाऱ्यांनी बसावं, अशी नको ती सूचना दिली. खरं तर अर्थसंकल्पाच्या आधी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची निवड झाली, त्यावेळी याचं सभागृहात भाजपचे हौशे-नौशे कार्यकर्त्यांना विनापरवाना अतिक्रमण केलं. त्यावेळी आयुक्त हर्डीकरांना भाजपच्या कार्यकर्त्यांना मागे व्हा, अशी सूचना देण्याचं धाडस झालं नाही. जे नियमांविरोधात घडत होतं, तिथं आयुक्तांनी मौन बाळगलं आणि आजवर पत्रकारांच्या उपस्थितीत सादर होणाऱ्या अर्थसंकल्पावेळी आयुक्तांनी पहिल्यांदाच नको ती सूचना केली. अर्थसंकल्प सादर झाल्यावर मी पत्रकारांशी बोलेन, असं म्हणत प्रभारी आयुक्तांनी अप्रत्यक्षपणे पत्रकारांना बाहेर जाण्याच्या सूचना दिल्या. असं म्हणताचं पत्रकार आणि आयुक्तांमध्ये वाद झाले. एकतर भाजपच्या हौशे-नौशे कार्यकर्ते आत आले, त्यावेळी आपण चुप्पी साधली. मग आता नको ते नियम सांगून आपण काय साध्य करताय? असा प्रश्न विचारला असता आयुक्त अनुत्तरित झाले. आयुक्तांनी या नको त्या सूचना दिल्यानं पत्रकारांच्या अनुपस्थितीत अर्थसंकल्प सादर झाला.

## राष्ट्रीय अस्मिता आणि समाजजागृतीचा दस्तऐवज

पिंपरी (दै. संध्या) :

■ 'हिंदू जागरणाच्या १०० वर्षांची संघर्षयात्रा' प्रकाशित




पिंपळे सौदागर येथे शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सांस्कृतिक वार्तापत्र प्रकाशित "हिंदू जागरणाच्या १०० वर्षांची संघर्षयात्रा" या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभली. ग्रंथाचे प्रकाशन राष्ट्रीय स्वयंसेवक संघचे जिल्हा कार्यवाह मा. श्री. नरेंद्रजी पेंडसे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थित म्हणून भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे उपस्थित होते. तसेच सांस्कृतिक वार्तापत्रचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत विक्री अधिकारी श्री. निखिल देविदास वझे यांनीही कार्यक्रमास हजेरी लावली. या ग्रंथामध्ये गेल्या शंभर वर्षांतील हिंदू समाजजागरणाची वाटचाल, विविध सामाजिक व राष्ट्रीय चळवळी, संघटनात्मक कार्य, विचारप्रवाह आणि संघर्षमय प्रवासाचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. समाजपरिवर्तन, सांस्कृतिक जतन, राष्ट्रीय अस्मिता आणि संघटनशक्ती यांचे ऐतिहासिक संदर्भांसह विवेचन या पुस्तकात करण्यात आले आहे. विविध टप्प्यांवर आलेल्या आव्हानांचा उल्लेख करत त्या संघर्षातून उभ्या राहिलेल्या चळवळींचे दस्तऐवजीकरणही करण्यात आले आहे. मराठी भाषा दिनानिमित्त उपस्थितांना शुभेच्छा देताना मा. श्री. नरेंद्रजी पेंडसे यांनी मराठी साहित्यातील नवरसांची ओळख करून दिली. मराठी भाषा ही समृद्ध साहित्यपरंपरा लाभलेली असून तिच्या माध्यमातून समाजमन घडते, असे त्यांनी नमूद केले. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण रक्षण, स्वबोध आणि नागरी कर्तव्य या पाच प्रमुख विषयांवर समाजात प्रबोधन करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

## महापालिकेची 'अभय योजना' १ मार्चपासून लागू

पिंपरी (दै. संध्या) :

■ राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या पाठपुराव्याला यश




पिंपरी चिंचवड शहरातील थकबाकीदार नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाने १ मार्च २०२६ पासून 'अभय योजना' लागू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या योजनेअंतर्गत मालमत्ता कराच्या विलंब दंडावर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात येणार आहे. ही योजना १ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर अभय योजना सुरू करण्याची मागणी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांकडे केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर प्रशासनाने ही योजना जाहीर केली आहे.

## पिंपरी-चिंचवडच्या वीज प्रश्नावर विधानसभेत आमदार शंकर जगताप आक्रमक; शासनाचे 'लक्ष' वेधले..!

पिंपरी (दै. संध्या) :

■ आरडीएसएस आणि एनपीएसएएस अंतर्गत पिंपरी चिंचवडच्या विद्युत व्यवस्थेचा दर्जा वाढ करण्याकरता निधी उपलब्ध होणार



वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक गरजांनुसार पिंपरी-चिंचवड शहराच्या वीज यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकारकडून पुनर्गठित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस) अंतर्गत ११०० कोटी रुपयांच्या आराखड्याला गती देण्यात येणार आहे. दरम्यान, दीड वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ताथवडे उपकेंद्राच्या प्रस्तावावरून आमदार शंकर जगताप यांनी आक्रमक पवित्रा घेतला असता, विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी दिले आहे.

आमदार शंकर जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे पिंपरी-चिंचवड आणि भोसरी परिसरातील वीज समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधले. यावेळी आमदार जगताप म्हणाले, पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून २०५१ पर्यंत ती ९३ लाखांच्या घरात जाण्याची शक्यता आहे. चिंचवड मतदार संघालगत आयटीपार्क जवळ असल्यामुळे रावेत, किवळे, मामुर्डी, वाकड, ताथवडे आणि पिंपळे सौदागर या भागांत 'वर्क फ्रॉम होम' करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मात्र, पायाभूत सुविधा कमकुवत असल्याने वारंवार वीज खंडित होण्याच्या प्रकारांना नागरिक कंटाळले आहेत. चिंचवड मतदारसंघात महावितरणाचे पिंपरी व भोसरी हे दोन विभाग असून त्यामध्ये हिंजवडी वाकडसारखा आयटी पार्कचा समावेश आहे. शहराच्या वाढत्या विस्तारीकरणात किवळे मामुर्डी, रावेत, पुनावळे, ताथवडे या भागाचा वाढते विस्तारीकरण लक्षात घेता महावितरणच्या विभागाच्या वतीने पुरवण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा, मनुष्यबळ, भूमिगत केबल, ट्रान्सफॉर्मर, फीडर, उच्च दाबाचे उपकेंद्र, पावर ट्रान्सफॉर्मर बसवण्याची गरज आहे. औद्योगिक व्यावसायिक आस्थापना व नागरिकांना अखंड वीज पुरवठा करण्याकरता कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी यावेळी आमदार जगताप यांनी केली. विद्युत वाहिन्यांवरील लोड अधिक असल्यामुळे तांत्रिक बिघाड, देखभाल व दुरुस्तीच्या कामांमध्ये विलंब, वीज पुरवठ्याची सात्यतता, गुणवत्ता यामध्ये त्रुटी इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने फोरम ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज यांच्यावतीने वारंवार तक्रारी येतात. त्या अनुषंगाने महावितरणाच्या भोसरी व पिंपरी विभागातील दर्जावाढ करणे, शहरातील वीज ग्राहकांना चांगली सेवा देण्याकरिता पुनर्गठित वितरण क्षेत्र योजना (आरडीएसएस) अंतर्गत 192 कोटीचा प्रस्ताव व नागपूर पुणे स्पेशल असिस्टंट स्कीम (एनपीएसएएस ) योजनेअंतर्गत 156 कोटीचा शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत आमदार जगताप यांनी शासनाचे लक्ष वेधले.

सभागृहात शासनाचे लक्ष वेधताना आमदार शंकर जगताप म्हणाले, मोशी, चऱ्होली आणि ताथवडे येथे अतिउच्चदाब (EHV) उपकेंद्रे उभारणे. वाढत्या ग्राहक संख्येनुसार काळेवाडी, हिंजवडी आणि बिजलीनगर या शाखांचे विभाजन करून नवीन कार्यालये सुरू करणे. भोसरी येथील 'सेंच्युरी इंका' उपकेंद्रामध्ये दोन नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवणे. भोसरी विधानसभा मतदारसंघातील ओव्हरहेड वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रूपांतर करण्याची मागणी जगताप यांनी केली.

आमदारांच्या प्रश्नांना उत्तर देताना ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, पिंपरी-चिंचवडच्या वीज आराखड्यासाठी आरडीएसएस (RDSS) आणि इतर योजनांमधून निधीची तरतूद केली आहे. पुणे जिल्ह्यासाठी ११०० कोटींचा प्रस्ताव असून, त्यातून पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी ३५० कोटी पिंपरी-चिंचवडसाठी आहेत. ताथवडे उपकेंद्राचा प्रस्ताव महापारेषणकडे दीड वर्षांपासून का प्रलंबित आहे, याची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. पुण्यातील सर्व लोकप्रतिनिधींसोबत लवकरच पुण्यात बैठक घेऊन या सर्व प्रलंबित कामांचा आढावा घेतला जाईल.

> पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, आयटी हब आणि वाढत्या नागरीकरणामुळे विजेची मागणी प्रचंड वाढली आहे. मात्र, वीज यंत्रणेच्या पायाभूत सुविधा कमकुवत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतोय. ताथवडे उपकेंद्रासारखे महत्त्वाचे प्रस्ताव मार्गी लागणे गरजेचे आहे . या प्रलंबित प्रस्तावांना तात्काळ मंजुरी मिळवून देणे आणि नवीन शाखा कार्यालयांच्या माध्यमातून ग्राहकांना गतीने सेवा देणे ही आमची प्राथमिकता आहे. या प्रश्नांवर शासन स्तरावर तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन मिळाले असून, लवकरच पुण्यात होणाऱ्या विशेष बैठकीत याचा पाठपुरावा केला जाईल." राज्य सरकारकडून पुणे जिल्ह्यासाठी पुनर्गठित वितरण क्षेत्र योजनेतून ११०० कोटी रुपयांच्या आराखड्याला गती मिळणार आहे. यामुळे पुणे व पिंपरी चिंचवड सह या भागातील औद्योगिक व निवासी ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे. यातून वीज पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे.
>
> **– शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ**

# पिंपरी चिंचवडमध्ये ३ ते ५ मार्चदरम्यान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

## ४३ देशांतील ११६ चित्रपटांचा सहभाग

## चित्रपट प्रेमींना सर्व चित्रपट पूर्णपणे विनामूल्य पाहण्याची सुवर्णसंधी

पिंपरी (दै. संध्या) :




पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी आणि गाथा फिल्म सोसायटी यांच्या वतीने तसेच सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई, भारतीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्था, पुणे (एफटीआयआय) यांच्या सहकार्याने आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे ३ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या जागतिक दर्जाच्या चित्रपट महोत्सवास शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड शहरात आयोजित करण्यात येत असलेला हा महोत्सव एक भव्य, वैविध्यपूर्ण आणि आशयघन सांस्कृतिक सोहळा ठरणार असून यंदाच्या महोत्सवात तब्बल ४३ देशांमधील ११६ चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. जागतिक स्तरावरील दर्जेदार कलाकृतींचा आस्वाद शहरातील चित्रपटप्रेमींना या महोत्सवाच्या माध्यमातून घेता येणार असून हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला आहे.

महोत्सवात भारतासह अमेरिका, युनायटेड किंगडम, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, स्वित्झर्लंड, नेदरलँड्स, पोलंड, स्वीडन, सायप्रस, इटली, ट्युनिशिया, इजिप्त, मोरोक्को, लेबनॉन, पॅलेस्टाईन, चिली, ब्राझील, जपान, थायलंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, रशिया, दक्षिण कोरिया, अर्जेंटिना, मेक्सिको, तुर्की, इराण, दक्षिण आफ्रिका आणि ग्रीस आदी देशांचा सहभाग आहे. विविध खंडांतील देशांमधून आलेल्या चित्रपटांमुळे महोत्सवाला खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. या महोत्सवात लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट अशा विविध प्रकारच्या चित्रपटांचा समावेश असून सर्व वयोगटातील प्रेक्षकांना लक्षात घेऊन चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक चित्रपटातून समाजमनाला स्पर्श करणारे आणि विचारप्रवर्तक विषय प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत.

महोत्सवात सादर होणाऱ्या चित्रपटांमधून विज्ञान आणि अंधश्रद्धा, रूढीपरंपरा, समाजव्यवस्था, निसर्ग व पर्यावरण, तंत्रज्ञान, प्रेम व मानवी भावना, महापूर व आपत्ती व्यवस्थापन तसेच महापुरुषांच्या जीवनावर आधारित असे विविध विषय मांडण्यात आले आहेत. याशिवाय शिक्षण व ज्ञानप्रबोधन, महिला सक्षमीकरण व लैंगिक समानता, युवा नेतृत्व विकास, ग्रामीण विकास व शाश्वत प्रगती, सामाजिक समता व मानवाधिकार, आरोग्य व मानसिक स्वास्थ्य जनजागृती, बालहक्क, कला व लोकसंस्कृती संवर्धन, उद्योजकता व नवकल्पना, जागतिक शांतता, दिव्यांग सक्षमीकरण, क्रीडा प्रेरणा, हवामान बदल जनजागृती आणि कुटुंब व्यवस्थेतील मूल्ये अशा सकारात्मक व समाजाभिमुख विषयांचाही देखील समावेश आहे.

चित्रपट क्षेत्रात महिलांना अधिक संधी आणि व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने महोत्सवात 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' हा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महिला दिग्दर्शकांच्या सर्जनशीलतेचा गौरव करण्याचा हा उपक्रम विशेष लक्षवेधी ठरणार आहे. याशिवाय, 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' हा शहराच्या सांस्कृतिक समृद्धीत भर घालणारा आणि नव्या विचारांना चालना देणारा उपक्रम ठरणार आहे. पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६ अंतर्गत बुधवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी चित्रपट महोत्सवातील विविध स्पर्धा विभागांतील उत्कृष्ट चित्रपटांना सन्मानित करून पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. महोत्सवादरम्यान प्रदर्शित करण्यात आलेल्या लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट तसेच दीर्घपट या विविध गटांमधील निवडक कलाकृतींना सन्मानित करण्यात येणार असून 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' या विशेष पुरस्काराचाही यावेळी प्रदान करण्यात येणार आहे. या समारंभास चित्रपटसृष्टीतील मान्यवर, परीक्षक तसेच सहभागी दिग्दर्शक व निर्माते उपस्थित राहणार आहेत.

'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' या मराठी चित्रपटाचे विशेष स्क्रीनिंग 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' मध्ये ग. दि. माडगूळकर सभागृह येथे ५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आले आहे. मराठी माध्यमातील शिक्षणव्यवस्था, बदलते सामाजिक वास्तव आणि स्थानिक भाषेतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे. मराठी भाषा, शिक्षण आणि सांस्कृतिक ओळख यांचा परस्परसंबंध प्रभावीपणे उलगडणारा हा चित्रपट महोत्सवातील विशेष आकर्षण ठरणार असून चित्रपटप्रेमींना मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनाच्या दृष्टीने चिंतन करण्याची संधी उपलब्ध करून देणार आहे.

> 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' हा आपल्या शहराच्या सांस्कृतिक समृद्धीला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. तब्बल ४३ देशांतील ११६ दर्जेदार चित्रपटांच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि मानवी मूल्यांवर आधारित आशयपूर्ण कलाकृती नागरिकांना पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नव्या विचारांना दिशा मिळेल, तसेच विशेषतः महिला दिग्दर्शकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी ठरेल. शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या विनामूल्य महोत्सवाचा लाभ घ्यावा.
>
> **– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२६' हा केवळ चित्रपट प्रदर्शनाचा कार्यक्रम नसून विविध देशांतील आशयघन आणि दर्जेदार कलाकृतींच्या माध्यमातून सांस्कृतिक संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न आहे. यंदा ४३ देशांतील ११६ चित्रपटांची निवड करण्यात आली असून लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन आणि दीर्घपट अशा विविध प्रकारांचा समावेश आहे. समाजप्रबोधन, महिला सक्षमीकरण, पर्यावरण, तंत्रज्ञान, मानवी मूल्ये आणि जागतिक शांतता अशा विषयांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. विशेषतः 'सर्वोत्कृष्ट महिला दिग्दर्शक' पुरस्काराच्या माध्यमातून चित्रपट क्षेत्रातील महिलांच्या योगदानाचा गौरव करण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा.
>
> **– दत्ता गुंड, संस्थापक, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चोपडज शाळेत विज्ञान दिन साजरा

चोपडज (बारामती) (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चोपडज येथे विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.इयत्ता पहिली ते चौथी इयत्तेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या प्रयोगांचे सादरीकरण केले. प्रदर्शनाचे उद्घाटन बबनराव निकम यांनी केले.यावेळी हनुमंत साळुंखे, परशुराम गाडेकर (उपसरपंच ग्रामपंचायत चोपडज),चव्हाण मॅडम (अंगणवाडी सेविका), रेश्मा गाडेकर (अंगणवाडी मदतनीस),छाया लोणकर,पुजा गायकवाड,मुख्याध्यापक गाडेकर सर,शिक्षिका जगताप मॅडम,महामुनी सर व गावातील महिला,ग्रामस्थ उपस्थित होते.लहान मुलांनी अतिशय सुंदर प्रयोग सादरीकरण केले याबद्दल उमेश गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप व पेन वाटप केले. यावेळी मुख्याध्यापक गाडेकर व शिक्षक यांनी शाळेत विज्ञान प्रदर्शन भरवून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे प्रोत्साहन दिले आहे.

### बारामती तालुक्याचे ग्रामदैवत चाँदशाहवली बाबांचा ऊरूस रद्द



बारामती (दैनिक संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधना मुळे बारामती तालुक्याचे ग्रामदैवत हजरत पीर चाँदशाहवली बाबांचा एप्रिलमध्ये सालाबादप्रमाणे होणारा यावर्षीचा ऊरूस साजरा होणार नाही असे दर्गा मस्जिद ट्रस्टी कमिटी, सर्व मुजावर मानकरी व समस्त ग्रामस्थ बारामती यांनी जाहीर केले आहे. बारामतीच्या ऊरूस उत्सवात साजरे केले जाणारे मनोरंजनाचे सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करून धार्मिक पद्धतीत शांततेने पार पाडण्याचा निर्णय कमिटीच्या बैठकीत घेण्यात आला.तरी बारामती तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी व बारामती पंचक्रोशितील नागरिकांनी हा ऊरूस कार्यक्रम धार्मिक पद्धतीने नैवेद्य-नारळ दाखवून साध्या पद्धतीने होईल याची नोंद घ्यावी.दादांच्या निधनामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे तरी कोणीही ऊरूस उत्सवात आनंदोत्सव साजरा करणार नाही असाही निर्णय कमिटीच्या वतीने घेण्यात आला.



### एनएमएमएस परीक्षेत वनपुरीच्या भैरवनाथ विद्यालयाचे यश

सासवड (दैनिक संध्या) : राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती एनएमएमएस परीक्षेत पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाच्या वनपुरी येथील श्री भैरवनाथ विद्यालयाने यश संपादन केले आहे. या परीक्षेत विद्यालयातील सहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ईश्वरी संतोष कुंभारकर (८८ गुण), सोहम अजित बोरकर (८५ गुण), संग्राम दिलीप काळे (८३ गुण), परिणीता संतोष हगवणे (७४ गुण), ओम रामेश्वर बोरकर (७३ गुण) आणि स्नेहल दत्तात्रय कुंभारकर (७२ गुण) हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. याबरोबरच विज्ञान क्षेत्रातही या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे. भंडारा येथे झालेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात इयत्ता सातवीच्या श्रेयश निलेश कुंभारकर याच्या प्रकल्पाचे विशेष कौतुक झाले. तसेच इयत्ता आठवीतील संग्राम काळे आणि अथर्व कुंभारकर यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात द्वितीय क्रमांक पटकावून विद्यालयाचा नावलौकिक वाढवला. या यशाबद्दल पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश उरसळ, शाळा समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र कुंभारकर आणि मुख्याध्यापिका लता बोकड यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. यावेळी वैशाली यादव, अनिता खेसे, दत्तात्रय रोकडे, सुरेश गोरे यांसह सर्व शिक्षक उपस्थित होते.



### हभप रामभाऊ केसरकर यांचे निधन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : कोरेगावमुळ (ता. हवेली) बोधे काकडे वस्ती येथील ह.भ.प.रामभाऊ बापु केसकर यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते जयराम केसकर यांचे वडील आहे.

### चाकणला बंद पडलेल्या स्ट्रीट लाईटच्या दुरुस्तीचे काम पूर्ण



चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषद हद्दीतील आयफील सिटी, राणूबाईमळा ते तळेगाव चौक या दरम्यान गेल्या अनेक दिवसांपासून बंद पडलेल्या स्ट्रीट लाईटच्या दुरुस्तीचे काम मार्गी लागले आहे.स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आणि चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व गटनेते नितीन गोरे यांच्या मार्गदर्शना खाली नगरसेवक हर्षद लेंडघर व नगरसेविका स्वाती लेंडघर यांनी या कामासाठी अखंडपणे पाठपुरावा केला होता. आयफील सिटी, राणूबाईमळा ते तळेगाव चौक या दरम्यान गेल्या अनेक दिवसांपासून स्ट्रीट लाईट बंद होत्या. पादचारी व वाहन चालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. छोट्या मोठ्या वाहनांना वाहने चालविताना अडथळा येत होता. चाकण तळेगाव चौक ते आयफील सिटी या दरम्यान बंद असलेली स्ट्रीट लाईट तातडीने दुरुस्त करावी, व नागरिकांना दिलासा मिळावा, अशी ठोस मागणी हर्षद लेंडघर व स्वाती लेंडघर यांनी चाकण नगरपरिषद प्रशासनाकडे केली होती. हर्षद लेंडघर यांनी सांगितले की," स्ट्रीट लाईटच्या दुरुस्तीचे काम मार्गी लागल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. रात्रीच्या वेळी सुरक्षित व सुरळीत वाहतुकीस मोलाची मदत होणार आहे. माझ्या प्रभागाचा विकास हाच माझा ध्यास राहील. लोकोपयोगी कामे आणि पायाभूत सुविधा मार्गी लावण्याची आमची भूमिका राहील."

# मराठीची खरी ताकद तिच्या बोलीभाषेत - उपमहापौर संजय घाडी

## सुवर्ण महोत्सवी दिवाळी अंकाचा पारितोषिक वितरण समारंभ

बारामती (दै. संध्या)



मराठी ही केवळ एक भाषा नाही, तर ती महाराष्ट्राची अस्मिता आहे. ती आपली मराठी माऊली आहे. शिवरायांच्या तलवारीच्या तेजासोबतच मराठी भाषेने स्वराज्याचा स्वाभिमान जपला. आज जगातील पहिल्या १५ प्रमुख भाषांमध्ये मराठीचा समावेश होतो, ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. परंतु, आजच्या जागतिकीकरणाच्या युगात आपण मराठी भाषेबद्दल थोडे उदासीन होत आहोत का? असा प्रश्न पडतो. आपण इंग्रजी शिकावी, ती काळाची गरज आहे, पण मराठीचा विसर पडू देऊ नये. आपल्या घरात, व्यवहारात आणि प्रशासनात मराठीचा वापर वाढवणे, हीच कुसुमाग्रजांची आठवण जागवत मराठी भाषा गौरव दिन करणे सार्थ ठरेल. मराठी भाषा ही अत्यंत समृद्ध आणि लवचिक भाषा आहे. मराठीची खरी ताकद तिच्या बोलीभाषेत आहे. अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी, झाडीबोली अशा अनेक बोलींनी मराठीचे अंगण सजलेले आहे. पण आज प्रश्न उभा राहतोय तो मराठीच्या अस्तित्वाचा आणि संवर्धनाचा. केवळ वर्षातून एक दिवस मराठी दिन साजरा करून भाषा टिकणार नाही. त्यासाठी ती रोजच्या जगण्याची भाषा झाली पाहिजे असे उद्गार मुंबईचे उपमहापौर संजय घाडी यांनी काढले.

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई यांच्या प्रतिष्ठित ५० व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत मनोरंजनकार मित्र स्मृती सर्वोत्कृष्ट अंक नवलाई दिवाळी अंकाचे पारितोषिक कार्यकारी संपादक प्रभू कापसे यांनी पारितोषिक स्वीकारले.

यावेळी व्यासपीठावर उद्योजक अशोक पाटील, ऋतुरंगचे संपादक अरुण शेवते, चंद्रकांतच्या संपादिका श्रीमती निलिमा कुलकर्णी, मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर, दादर सार्वजनिक वाचनालयाचे कार्याध्यक्ष मनोहर साळवी, मराठी विचारधारा प्रतिष्ठानचे विश्वस्त विकास होशिंग, माजी नगरसेवक ॲड. मनमोहन चोणकर, ॲड. देवदत्त लाड, संजीव गुप्ते आदी मान्यवर उपस्थित होते. संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी संस्थेच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले अशोक पाटील (सिनियर व्हाईस प्रेसिडेंट ऑपेरेशन्स लेक्चलर इंडिया प्रा. लिमिटेड ) यांनी आपल्या भाषणात जीवनाची सुरुवात महापालिका शाळेत मराठीमधून झाली मात्र आज आपला देश तांत्रिकदृष्ट्या सज्ज होण्यासाठी लागणाऱ्या प्रक्रियेत काम करण्याची मला संधी मिळाली आहे. तंत्रज्ञान आणि जगभरात फिरताना इंग्रजीसह इतर भाषांचा सामना करावा लागतो. मात्र जन्मापासून मराठी ही आपल्यात भिनलेली असते. "आई" आणि "मातृभाषा" या दोन गोष्टी माणसाच्या आयुष्यात कधीही बदलता येत नाहीत. ज्याप्रमाणे आई आपल्याला जन्म देते, तशीच मातृभाषा आपल्याला विचार करायला शिकवते. आज आपण पाहतो की, कॉन्व्हेंट संस्कृतीमुळे अनेक मुले मराठी बोलताना अडखळतात किंवा मराठी बोलणे त्यांना कमीपणाचे वाटते. मित्रांनो, लक्षात ठेवा, ज्या झाडाची मुळे खोल असतात, तेच झाड वादळात टिकून राहते. आपली मुळे आपल्या मातृभाषेत आहेत. जगातील अनेक विकसित देश जसे की जपान, जर्मनी, फ्रान्स हे आपली सर्व प्रगती त्यांच्या मातृभाषेतूनच करतात. मराठी भाषेत जी आपुलकी आहे, जी गोडी आहे, ती इतर कोणत्याही भाषेत नाही. साहित्यापासून विज्ञानापर्यंत सर्व विषयांचे ज्ञान आज मराठीत उपलब्ध आहे. आपण सोशल मीडियावर पोस्ट टाकताना, मेसेज करताना मराठीचा वापर वाढवला पाहिजे. आपली भाषा टिकली तरच आपली संस्कृती आणि परंपरा टिकली. त्यामुळे मराठीचा न्यूनगंड बाळगू नका, तर मराठीचा सार्थ अभिमान बाळगा. मराठी ही केवळ बोलण्याची भाषा नाही, ती संस्कारांची भाषा आहे. जेव्हा आपण वैयक्तिक पातळीवर हे बदल करू, तेव्हाच मराठी खऱ्या अर्थाने 'राजभाषा' होईल. मराठी ही केवळ कागदावरची भाषा न राहता ती लोकांच्या हृदयातील भाषा झाली पाहिजे.

एक छंद म्हणून अंदाजे १३५० प्रकाशनाचे ३५०० नवे-जुने वेगवेगळ्या दिवाळी अंकांचा संग्रह करून त्यातून महाराष्ट्र सारस्वताच्या प्रांगणात ११७ वर्षाच्या दिवाळी अंक परंपरेचा अमूल्य ठेवा जतन करणारे मनमाड येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक अनिल शिनकर यांना ग्रंथालय चळवळीतील धुरीण दिवंगत दत्ता कामथे स्मृती ग्रंथसखा सन्मान पुरस्कार देण्यात आला, याचबरोबर ललित सारख्या मराठी साहित्याचा वेध घेणाऱ्या मासिकात साहित्यिक रविप्रकाश कुलकर्णी हे गेली तीन दशके दरवर्षी दिवाळी अंकात काय वाचाल हा अभ्यासपूर्ण लेख लिहून दिवाळी सणाची चाहूल देत असतात.

दिवाळी अंकांच्या परंपरेचा अभ्यासक म्हणून त्यांच्या गुणवत्तापूर्ण कामाची दखल घेऊन मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने त्यांना सुवर्णमुद्रा जीवन गौरव सन्मान पुरस्कार देण्यात आला.

संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या दिवंगत कामगार नेते वसंतराव होशिंग स्मृती "वैभवशाली मराठी भाषेचे गद्दार कोण? या राज्यस्तरीय लेख स्पर्धेतील यशस्वी प्रथम क्रमांक अर्णव चव्हाण, द्वितीय क्रमांक मयुर दातार, तृतीय क्रमांक गुरुदत्त वाकदेकर आणि उत्तेजनार्थ म्हणून डॉ.गौतमी अनुप पाटील, सौ.सुनिती सु.काळे, निर्मला गांगुर्डे यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला वृत्तपत्र लेखन, दिवाळी अंक संपादक साहित्य, पत्रकारिता आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि दर्जेदार दिवाळी अंक परंपरेच्या जतनासाठी गेली पाच दशके ही राज्यस्तरीय स्पर्धा संघाच्या वतीने सातत्याने आयोजित केली जाते. राज्यभरातून प्रकाशित होणाऱ्या विविध दिवाळी अंकांमधून यंदा ५० व्या स्पर्धेअंतर्गत उत्कृष्ट आशय संपादकीय दृष्टी, मांडणी आणि साहित्यिक गुणवत्ता या निकषांवर दिवाळी अंकाची म्हणून निवड करण्यात आली. कार्याध्यक्ष रमेश सांगळे आणि कार्यक्रम प्रमुख दिगंबर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली माजी अध्यक्ष प्रकाश नागणे, विजय कदम, कोषाध्यक्ष आत्माराम गायकवाड, राजन देसाई, पास्कोल लोबो, रामचंद्र जयस्वाल यांनी विशेष मेहनत घेतली. आभार प्रदर्शन कार्यवाह नितीन कदम यांनी केले.


## सर्व रस्ते अतिक्रमण मुक्त करा; आमदार कुल यांची मागणी

खुटबाव (दै. संध्या)

पुणे शहर व परिसरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी सर्व प्रमुख रस्ते अतिक्रमण मुक्त करा अशी मागणी आमदार राहुल कुल यांनी विधानसभेत केली आहे. यावेळी लक्षवेधी सूचनेद्वारे पुण्यातील वाहतूक समस्येवर बोलताना कुल म्हणाले की, पुणे शहर आणि परिसरातील वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनधिकृत फेरीवाल्यांवर कडक कारवाई करावी. पुण्याच्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून सुरू असलेले रिंग रोड आणि एलिव्हेटेड कॉरिडॉरचे प्रकल्प एका निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याची गरजही त्यांनी यावेळी अधोरेखित केली. पुणे शहरात प्रवेश करणारे आणि शहराला जोडणारे सर्व प्रमुख रस्ते सध्या अतिक्रमणांच्या विळख्यात आहेत.एमएसआरडीसी' मार्फत राबवण्यात येणारा आउटर रिंग रोड, 'पीएमआरडीए'चा इनर रिंग रोड आणि पुणे-नगर तसेच पुणे-सोलापूर महामार्गावरील प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर हे प्रकल्प पुण्यासाठी जीवनदायी ठरणार आहेत.

## अजित पवार यांच्या निधनाला एक महिना; भावनिक श्रद्धांजली

बारामती (दै. संध्या)



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनाला आज एक महिना पूर्ण झाला. या दुर्दैवी घटनेचा धक्क्यातून बारामतीकर अजूनही सावरू शकलेले नसून शहरात भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

नटराज नाट्यकला मंडळाच्या वतीने नटराज कला दालन येथे सकाळी सहा वाजता विविध भजनी मंडळांच्या सहभागाने भजन कार्यक्रम झाला. त्यानंतर प्रद्युम्न शिरसागर, आबा परकाळे, दुर्गाप्रसाद कुलकर्णी, सुवास अष्टपुत्रे आदी कलाकारांनी भक्तिगीते सादर केली.

सकाळी आठ वाजता सर्व धर्मीय धर्मगुरूंच्या उपस्थितीत सर्वधर्मीय प्रार्थना करण्यात आली. सकाळी नऊ वाजता, ज्या वेळी विमान अपघात घडला होता, त्या क्षणी उपस्थितांनी 'पसायदान'चे सामूहिक गायन करून दोन मिनिटे शांत उभे राहत श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या नागरिकांना मंडळाच्या वतीने अजितदादांची प्रतिमा भेट देण्यात आली. तसेच सायंकाळी सात वाजता ह.भ.भ. आकाश कामठे (जेजुरी) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. या कीर्तनालाही मोठ्या संख्येने बारामतीकर उपस्थित होते.

अशा प्रकारे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांतून बारामती शहराने अजित पवार यांच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन केले.

## नर्मदा परिक्रमा म्हणजे भक्ती, शक्ती व सहनशक्तीचे ऊर्जास्तोत्र – डॉ. रवींद्र भोळे

कोरेगावमुळं (दै. संध्या)




संयम, विश्वास आणि अहंकाराचा नाश करण्याची साधना म्हणजे नर्मदा परिक्रमा होय. नर्मदा परिक्रमा ही भक्ती, शक्ती आणि सहनशक्तीचे ऊर्जास्तोत्र आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे (उरुळी कांचन) यांनी केले.

नर्मदेच्या पवित्र उगमस्थानापासून ते अमरकंटक किंवा ओंकारेश्वर येथे समाप्त होणारी ही परिक्रमा अत्यंत कठीण आणि तपश्चर्येची मानली जाते. पायात चामड्याच्या वस्तू न वापरता, सात्विक आहार घेत आत्मिक शक्ती जागृत करून ही परिक्रमा केली जाते. ऋषी मार्कंडेय यांनी हजारो वर्षांपूर्वी नर्मदा परिक्रमा केल्याचा उल्लेख आहे.

तपस्वी हरी प्रल्हाद बढे व डॉ. हरी निवृत्ती पाटील यांनी सुमारे ३६०० किलोमीटरचे अंतर १०५ दिवसांत पूर्ण केले. जीवनातील महत्त्वाचा काळ काढून त्यांनी ही परिक्रमा पूर्ण करत तपाचे सामर्थ्य प्राप्त केल्याचे डॉ. भोळे यांनी सांगितले. भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीतेच्या १८व्या अध्यायात यज्ञ, दान, तप आणि कर्म यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. कलियुगात वेळ नसल्याची सबब देण्यापेक्षा सत्कर्मासाठी वेळ द्यावा लागतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल वीरशैव लिंगायत सेवा मंडळ येथे हरी प्रल्हाद बढे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. अण्णासाहेब पाटील, डॉ. हरी निवृत्ती पाटील, आदिशक्ती मुक्ताई देवस्थानचे अध्यक्ष अमोल पाटील, मुरलीधर खर्चे, नारायण बढे, मंदाकिनी बढे, अंकुर बढे, ममता बढे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन सविता हरी बढे व अंकुर हरी बढे यांनी केले. सूत्रसंचालन अंकिता नारखेडे व स्नेहल बारदोषकर यांनी केले. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

## तणावमुक्त जीवन जगलात तरच आनंद प्रसन्नता व समाधान लाभेल


शिरूर (दै. संध्या)

श्री शिव महापुराण कथेसाठी शिरूर परिसरात भक्तीचा महासागर उसळला आहे. दि. २४ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत रामलिंग रोडवरील भव्य कथा रंगत असून, आज चौथ्या दिवसाचा सोहळा उत्साहात पार पडला. "हर हर महादेव" आणि "ॐ नमः शिवाय" च्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. प्रदीपजी मिश्रा म्हणाले, भक्ती आणि श्रद्धा हवी, मन मोठं हवं. सर्वांशी प्रेमाने वागा. घरी आलेल्या पाहुण्याचे आदरयुक्त स्वागत करा.

लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या जीवनात ताण-तणाव वाढले आहेत. तणावमुक्त जीवन जगलात तरच आनंद, प्रसन्नता आणि समाधान लाभेल," तणावमुक्तीचा सोपा मार्ग असा जीवनमंत्र आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक पं. आचार्य प्रदीपजी मिश्रा यांनी दिला. शंकराचे एक नाव आशुतोष आहे. प्रामाणिक भावनेने केलेला नमस्कारही भगवान स्वीकारतात. जीवन हसत-खेळत जगा; हसू शकतो तो फक्त माणूसच," असा हृदयस्पर्शी संदेश त्यांनी दिला. दररोज एक बेलपान आणि एक तांब्या पाणी शिवलिंगास अर्पण करण्याचा साधा उपाय त्यांनी सांगितला. "चांगलं बोलणाऱ्यांची आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांची प्रगती कोणी रोखू शकत नाही," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# दौंडमधील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रत्येकी ५ कोटींचा निधी व 'ब' वर्ग दर्जा; विधानसभेत राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

यवत (दै. संध्या)



दौंड मतदारसंघातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा कायापालट करण्यासाठी आणि भाविकांना उत्तम सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार राहुल कुल यांनी विधानसभेत केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. राहू येथील श्री शंभू महादेव मंदिर, कुसेगावचे भानोबा देवस्थान आणि नारायण बेट (देऊळगाव गाडा) या तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा देऊन त्यांच्या विकासासाठी प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन राज्य सरकारने दिले आहे. विधानसभेत 'अर्धा तास चर्चे'च्या माध्यमातून आमदार राहुल कुल यांनी मतदारसंघातील तीर्थक्षेत्रांचा प्रश्न आक्रमकपणे मांडला. यावेळी त्यांनी केवळ या तीनच नव्हे, तर केडगावचे पद्मावती माता मंदिर, रोटीचे रोटमलनाथ मंदिर आणि राजेगावचे राजेश्वर मंदिर या देवस्थानांच्या विकासासाठीही तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली. आमदार कुल यांच्या प्रश्नाला उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, "दौंडमधील या तीर्थक्षेत्रांचे महत्त्व मोठे असून भाविकांची संख्याही लक्षणीय आहे. राहू, कुसेगाव आणि नारायण बेट या देवस्थानांना 'ब' वर्ग दर्जा देण्याबाबतच्या प्रस्तावातील त्रुटी जिल्हा परिषदेकडून तातडीने दूर केल्या जातील. या प्रत्येक देवस्थानाला बळकटी देण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी शासन देईल." याव्यतिरिक्त, नारायण बेट येथील वनक्षेत्रातील जागा आणि पोलीस अधीक्षक (SP) कार्यालयाकडून मिळणारा भाविकांच्या संख्येचा दाखला यांसारख्या तांत्रिक बाबी तातडीने निकाली काढण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

आमदार राहुल कुल यांनी यावेळी दौंडमधील इतर 'क' वर्ग तीर्थक्षेत्रांनाही 'ब' वर्गात समाविष्ट करून घेण्याची मागणी लावून धरली. केडगाव, रोटी आणि राजेगाव येथील प्रस्तावांची पडताळणी करून निकषात बसणाऱ्या सर्व देवस्थानांना न्याय दिला जाईल, असे आश्वासनही यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून देण्यात आले.

"मतदारसंघातील धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. केवळ दर्जा वाढवणे आमचे उद्दिष्ट नसून, त्या ठिकाणी येणाऱ्या लाखो भाविकांना रस्ते, पाणी आणि भक्तनिवास यांसारख्या सर्व पायाभूत सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी हा प्रयत्न आहे. सरकारने दिलेल्या प्रत्येकी कोटींच्या निधीमुळे या देवस्थानांच्या विकासाला मोठी गती मिळेल."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बारावीचा पेपर सुरु असतानाच भोंग्यावरुन ओरडून सांगितली उत्तरे

किनवट (दैनिक संध्या) : राज्यात बारावीच्या परीक्षा सुरू असताना किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथील परीक्षा केंद्रावर 'कॉपी'चा एक अत्यंत धक्कादायक आणि अजब प्रकार समोर आला आहे. चक्क लाऊडस्पीकर (भोंगा) लावून बारावीच्या जीवशास्त्राच्या (Biology) पेपरची उत्तरे अज्ञात व्यक्तीने विद्यार्थ्यांना ओरडून सांगितली. या प्रकारामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या सुरक्षिततेचे धिंडवडे निघाले असून परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. दहेली तांडा येथील स्व. संगीता देवी उच्च माध्यमिक विद्यालय आश्रमशाळा येथे बुधवारी दुपारी जीवशास्त्राचा पेपर सुरू होता. याच वेळी केंद्राजवळील जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीवर एका अज्ञात व्यक्तीने भोंगा लावला आणि त्याद्वारे वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे सांगण्यास सुरुवात केली. ऐन परीक्षेच्या वेळी भोंग्याचा आवाज घुमल्याने विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ उडाला आणि कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा उडाला. या घटनेची माहिती मिळताच केंद्र संचालक सुबोध थोरात यांनी सिंदखेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी घटनास्थळावरून भोंगा जप्त केला असून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले कॉपीमुक्त परीक्षेसाठी परिश्रम घेत असताना, परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त नव्हता का? असा सवाल आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे. पोहेकॉ कोंडापलकुलवार या प्रकरणाचा तपास करत असून आरोपी अद्याप फरार आहे.




### कार, मोटारसायकलमध्येही लागेल आता विमानासारखा 'ब्लॅकबॉक्स'

नागपूर (दैनिक संध्या) : जगभरात कुठेही विमानाचा अपघात झाला की सर्वात आधी शोधला जातो त्यातील 'ब्लॅकबॉक्स'. या ब्लॅकबॉक्समुळेच विमानाच्या अपघाताची अचूक कारणे समोर येतात. असाच ब्लॅकबॉक्स लवकरच कार आणि मोटारसायकलमध्ये लागलेला दिसेल. नागपूरच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी हे महत्त्वपूर्ण संशोधन केले असून भविष्यात लहान-मोठ्या अपघाताची कारणे शोधण्यासाठी आणि अलर्ट मिळाल्यावर मदत पोहोचविण्यासाठी क्रांतिकारी ठरणार आहे. एस.बी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्चचे सहायक प्राध्यापक डॉ. राहुल पेठे आणि हर्ष सूर्यवंशी, रोहित शहारे, वृषभ गिल्लरकर व आर्य पाठेकर यांनी हे संशोधन केले आहे. 'स्मार्ट सिस्टीम फॉर डिटेक्टिंग व्हेईकल्स सिग्नल्स ॲण्ड ॲक्सिडंट्स' असे या प्रकल्पाचे नाव आहे. डॉ. पेठे यांच्या टीमने 'फेस गार्ड एटीएम सिक्युरिटी सिस्टीम' सुद्धा विकसित केली आहे. रोहित शहारे या विद्यार्थ्याचे यात महत्त्वाचे योगदान आहे. यामध्ये एटीएम व्यक्तीच्या चेहऱ्याची ओळख पटवेल. संबंधित व्यक्ती घरातील ठराविक लोकांना त्यांचा एटीएम वापरण्याची परवानगी देईल. परंतु त्याची माहिती व्यक्तीच्या व्हॉट्सॲपवर येईल. कुणी एटीएमची चोरी केली, पासवर्डही माहिती केला, तरी चेहऱ्याची ओळख पटल्याशिवाय तो पैसे काढू शकणार नाही. कुणी प्रयत्न केला, तर ताबडतोब त्याचा संदेश कार्डधारकाच्या मोबाइलवर जाईल. त्यांच्या परवानगीचा संदेश सिस्टीमला गेल्यावरच एटीएममधून पैसा काढता येईल. मुलाने एटीएम वापरला तरी त्याला पैसे काढू द्यायचे की नाही आणि होणारी चोरी वेळेवरच टाळता येईल, असा दावा डॉ. पेठे यांनी केला आहे. या टीमने स्वयंचलित ड्रोन सिस्टीम तयार केली आहे. यामध्ये ड्रोन शेतीच्या कामापासून आपत्काळात स्वतःच मदत पोहोचविण्याचे काम करेल. केवळ सिस्टीममध्ये त्याला ठराविक टास्क द्यावा लागेल. शेतात फवारणी करायची असेल, तर सिस्टीममध्ये किती एकरात फवारणी करायची, ही माहिती फिट करावी लागेल. त्यानंतर त्यात कीटकनाशक टाकले की ड्रोन स्वतःच फवारणीचे काम पूर्ण करून परत त्याच जागेवर येईल. याशिवाय ऑटोमॅटिक सोलर पॅनल क्लिनिंग सिस्टीमही या टीमने विकसित केले आहे, जे मोबाइलद्वारे जगाच्या कानाकोपऱ्यातून कुठूनही वापरता येईल.

# वास्तुआरेखकांनी शहरी पुनर्विकासाचा पुनर्विचार करावा

## कुणाल टिळक यांचे प्रतिपादन; 'ओपन आयडियाज नॅशनल कॉम्पिटिशनचे पारितोषिक वितरण



पुणे (दै. संध्या)

जुन्या-नव्या इमारती, काही वारसास्थळे, वाडे आणि अन्य प्रांतांतून स्वतंत्र वस्ती करून राहणारे समाजगट, अशी सरमिसळ हे आजच्या शहरांचे वास्तव आहे. या पार्श्वभूमीवर शहराचा विकास आणि गृहनिर्माण, यांचा पुनर्विचार वास्तूआरेखकांनी करावा, असे प्रतिपादन नगरसेवक कुणाल टिळक यांनी केले.

इनाफ फोरम व सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्ज यांच्या संयुक्त विद्यमाने एव्हीपी ग्रुप च्या सहकार्याने आयोजित पाचव्या 'ओपन आयडियाज नॅशनल स्पर्धा २०२५'च्या पारितोषिक वितरण समारंभात कुणाल टिळक बोलत होते. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या फिरोदिया सभागृहात झालेल्या या सोहळ्याप्रसंगी 'इनाफ'चे संस्थापक अध्यक्ष कीर्ती शहा, सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हजच्या विश्वस्त अनघा परांजपे-पुरोहित, हाऊसिंग ॲंड अर्बन डेव्हलपमेंट विषयातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सल्लागार जेफ्री पेन (ऑनलाईन), व्हीके ग्रुपचे विश्वास कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

ह्या नॅशनल स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतामधून स्पर्धकांकानी सहभाग नोंदविला होता. अफोर्डेबल अर्बन हाऊसिंग,फर्निचर आणि इंटिरियर डिझाईन, रूरल हौसिंग आणि स्लम इम्प्रोव्हमेन्ट या मध्यवर्ती संकल्पनेवर हि स्पर्धा आयोजित केली होती. यातील विजेत्यांचा गौरव यावेळी करण्यात आला. त्यांनी आपल्या प्रकल्पाविषयी सादरीकरण केले. त्याचप्रमाणे एव्हीपी ग्रुप सोलापूर येथील चीफ मार्केटिंग ऑफिसर विश्वनाथ फाळके यांनी सोलापूर येथील रे नगर प्रकल्पाविषयी केस स्टडी सादर केली. कुणाल टिळक म्हणाले, "पुण्यात अनेक ऐतिहासिक वास्तू, मंदिरे, जुने वाडे, मंडई, तुळशीबाग, ग्रामदैवते, शनिवारवाडा, विश्रामबागवाडा, लाल महाल अशा वारसास्थळांसह जुन्या पेठेतील वाडे, बैठ्या घरांच्या जागी उभारलेल्या इमारती आहेत. या भागात पुनर्विकास होण्याची गरज आहे. त्यादृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे. परवडण्याजोग्या घरांची संकुले उभारताना तिथे छोट्या उद्यानांची, वृक्ष लागवड व्यवस्था करण्यास प्राधान्य असावे." कीर्ती शहा म्हणाले, शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. त्यामुळे शहरातील गृहनिर्माण अधिक आव्हानात्मक झाले आहे. आजही छोट्या घरात तीन पिढ्या एकत्र नांदण्याचे प्रमाण लक्षणीय दिसते. प्रत्येकाच्या अपेक्षा, गरजा निराळ्या असतात. मर्यादित जागेत या अपेक्षा पूर्ण करण्याचे नवे आव्हान नव्या पिढीच्या आर्किटेक्टसमोर आहे. स्पर्धेच्या माध्यमातून त्याची प्रचीती येत आहे. जेफ्री पेन यांनीही शहरी क्षेत्र राहण्यायोग्य आहे का, तसेच हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर शहरे निवासयोग्य असतील का, असे प्रश्न उपस्थित केले. घरांसाठी जागेची उपलब्धता ही समस्या बनली आहे आणि तरीही घरांची मागणी वाढती आहे, ही वस्तुस्थिती आहे. नव्या आर्किटेक्ट्ससमोर असलेले हे आव्हान मोठे आहे, असे ते म्हणाले. अनघा परांजपे पुरोहित यांनी परिचय करून देत स्पर्धेविषयीची माहिती दिली. डॉ. पूर्वा केसकर, आर्किटेक्ट ऋषिकेश कुलकर्णी, द्वैपायन चक्रवर्ती, अमोल उंबरजे यावेळी उपस्थित होते. केतकी करमरकर यांनी सूत्रसंचालन केले तर समन्वय भुमा रमन, व्यसना सनी, प्रियांका बुरंगे, शालीन पालकर आणि सुमित कापसे यांनी केले. विजेत्यांना कॅश प्राइजेस, सन्मानचिन्ह आणि सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले. भारतातील व विदेशातील तज्ञ मंडळी यांनी ज्युरी मेंबर म्हणून भूमिका पार पाडली.

हौसिंग स्टुडिओ च्या अंतर्गत घेतलेल्या स्पर्धेमध्ये ब्रिक कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी आणि व्हीआयटी वेल्लोर हे विजेते ठरले आहेत.

ओपन आयडियाज नॅशनल स्पर्धेचे विजेते पुढील प्रमाणे : रिया गोडांबे (म्हाडा प्रधानमंत्री एफओर्डेब्ल हौसिंग प्रोजेक्ट), रूपक कालीनपूर (गॉविनपूरम हौसिंग प्रोजेक्ट ) ॲन मॅरी चाकोचन (लाईफ मिशन हौसिंग प्रोजेक्ट), जीनु कुरेन (दादासाहेब फाळके टाउनशिप), शताक्षी सावंत (दाऊब कन्स्ट्रक्शन), परम मित्रा (सेटलमेंट पॅटर्न ऑफ प्राणपूर), निहारिक तारे (नायटिंग द नॅरेटिव्हस ), श्रद्धा खंडेलवाल (डीआयवाय शेल्टर)

# 'अजितदादांच्या निधनाबद्दल रोहित पवार करत असलेले राजकारण अत्यंत चुकीचे आणि घृणास्पद', अजित पवार गटाची टीका



ठाणे (दै. संध्या)

अजितदादा पवार यांच्या दु:खद आणि दुर्दैवी निधनाबद्दल आमदार रोहित पवार हे राजकारण करत आहेत. ही बाब अत्यंत चुकीची आणि घृणास्पद आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसअजित पवार पक्षाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी रोहित पवार यांच्यावर टीका केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे व पार्थ पवार यांच्यासमवेत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेऊन अजितदादा पवार यांच्या विमान अपघाताचे सत्य समोर आणावे, अशी मागणी केली होती. शिवाय त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सीबीआयमार्फत चौकशी करण्याची मागणीही केली होती. मात्र दुर्दैवाने आमदार रोहित पवार गेले काही दिवस राजकारण करत आहेत त्याबद्दल आनंद परांजपे यांनी नाराजी व्यक्त केली. आनंद परांजपे म्हणाले की, रोहित पवार यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यातील तांत्रिक अडचणींचा अभ्यास करून गुन्हा नोंदवला जाईल, असे आश्वस्त करुन देखील रोहित पवार यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि काल मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वस्त केल्यानंतर गुन्हा दाखल करण्याचे राजकारण रोहित पवार यांनी थांबवावे, असे आनंद परांजपे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, गेले काही दिवस राष्ट्रवादी काँग्रेसचे चार नेते, चार नेते अशाप्रकारचा आरोप रोहित पवार करत आहेत. खरंतर २ जुलै २०२३ मध्ये वेगळी राजकीय भूमिका घेतल्यानंतर आमचे दैवत अजितदादा पवार यांना कुटुंबाने एकटं कसं पाडलं हे संपूर्ण महाराष्ट्राने बघितले आहे. किंबहुना लोकसभा निवडणुकीत आमच्या उमेदवार श्रीमती सुनेत्रा अजित पवार या बाहेरच्या पवार आहेत आणि घरातील पवारांना मतदान करा, असे वक्तव्य वरिष्ठांकडून करण्यात आले होते याची आठवणही आनंद परांजपे यांनी करून दिली. तसेच विधानसभा निवडणुकीत अत्यंत हताश होऊन कुटुंबाने मला एकटं पाडलं पण बारामतीची जनता मला एकटं पाडणार नाही ही उद्विग्नता दादांनी व्यक्त केल्याचा व्हिडिओ आजही सगळ्यांकडे पहायला मिळत असल्याचे सांगितले.

# ई-चलनाविरोधात ५ मार्चपासून वाहतूकदारांचे बेमुदत आंदोलन

## महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीचा इशारा; शासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची पत्रकार परिषदेत मागणी

पुणे (दै. संध्या)




राज्यातील शाळा बस, कर्मचारी वाहतूक बसेस, आंतरराज्य व आंतरशहरी बस, टुरिस्ट कॅब, रिक्षा, टेम्पो तसेच मालवाहतूक करणाऱ्या सार्वजनिक सेवा वाहनांवरील कर, टोल, ई-चलन प्रणाली व अन्यायकारक प्रशासकीय नियमांविरोधात येत्या ५ मार्चपासून लोकसहभागातून बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा वाहतूक संघटना दिला आहे. त्यासाठी महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटीची स्थापना करण्यात आली असून, शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर संपावर जाण्याशिवाय पर्याय नसल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

शनिवारी पुण्यात पत्रकार परिषदेत घेत विविध वाहतूक संघटनांच्या प्रतिनिधींनी या जाचक नियमांचा निषेध नोंदवला. बस ऑपरेटर कॉन्फेडरेशन ऑफ इंडियाचे प्रसन्न पटवर्धन, रिक्षा पंचायतीचे नेते नितीन पवार, रिक्षा संघटनेचे नेते डॉ. केशव क्षीरसागर, राजेंद्र सिंह राजपूत, बाबा शिंदे, बस अँड कार ओनर्स असोसिएशनचे राजन जुनवणे, किरण देसाई, पिंपरी चिंचवड बस संघटनेचे दत्तात्रय भेगडे यांच्यासह शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक सेवा वाहने ही जनतेच्या दैनंदिन गरजांसाठी अत्यावश्यक सेवा देतात; मात्र केंद्र व राज्य शासनाकडून विविध करांद्वारे मोठ्या प्रमाणात महसूल वसूल केला जातो. रस्ते विकासासाठी पेट्रोल-डिझेलवरील सेसद्वारे निधी गोळा करूनही 'बीओटी' तत्वावर उभारलेल्या रस्त्यांवर पुन्हा टोल आकारला जात असल्याने दुहेरी आर्थिक बोजा वाहनधारकांवर पडतो. अनेक टोल रस्त्यांची अवस्था खराब असूनही ठेकेदारांवर कारवाई होत नाही. मोटार वाहन कायद्यातील तरतुदी असूनही अंमलबजावणी अपुरी आहे; मात्र 'नो पार्किंग'सारख्या कारणांवर मोठ्या प्रमाणात दंड वसुली केली जाते. दंड हा शिक्षेचा भाग असताना महसूल वाढीसाठी लक्ष्य देऊन कारवाई होत असल्याची तक्रार करण्यात आली. तसेच एप्रिल २०२५ मध्ये सीमा तपासणी नाके बंद करण्याची घोषणा होऊनही प्रत्यक्षात अनेक नाके सुरूच असून चालकांकडून बेकायदा वसुली होत असल्याचा दावा संघटनेने केला.

रेट्रोफिटमेंटच्या नावाखाली अतिरिक्त उपकरणे बसविण्याची सक्ती करून फिटनेस प्रमाणपत्र रोखले जाते, ही बाब अन्यायकारक असल्याचे सांगण्यात आले. ई-चलन नियमांमध्ये २० जानेवारी २०२६ पासून झालेल्या बदलानुसार दंडाच्या ५० टक्के रकमेची आगाऊ भरपाई केल्याशिवाय अर्ज ऐकला जात नाही व वाहन 'ब्लॅकलिस्ट' केले जाते, ही तरतूद घटनात्मक हक्कांना बाधक असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

करप्रणालीबाबतही संघटनेने आकडेवारी देत सांगितले की, राज्यात कर्मचारी वाहतूक वाहनांवर प्रति आसन ₹१,९०० व वातानुकूलित वाहनांवर ₹६,५०० वार्षिक कर आकारला जातो, तर काही राज्यांनी करात मोठी कपात केली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही करकपात करावी, अशी मागणी करण्यात आली. वाहतूकदारांशी संबंधित दंड, परवाना, जप्ती, कर व ई-चलन प्रकरणांसाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था स्थापन करावी, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. आंदोलनाबाबत नागरिक, शाळा व कंपन्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले.

# 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम

## भव्य पार्किंग व्यवस्थेची तयारी : महामार्गपासूनच मार्गदर्शक फलक : कलर कोडींग नुसार पार्किंगची व्यवस्था

खारघर (दै. संध्या) :



अल्पसंख्यांक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने खारघर येथे 28 फेब्रुवारी व 1 मार्च रोजी आयोजित 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमासाठी भाविकांच्या सोयीसाठी व्यापक आणि रंग-कोडनिहाय 33 ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन बस, कार आणि दुचाकींसाठी स्वतंत्र जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

प्रत्येक पार्किंग स्थळावरून कार्यक्रमाच्या ठिकाणी मोफत पिकअप आणि ड्रॉप सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे वाहन पार्क केल्यानंतर भाविकांना कार्यक्रमस्थळी पोहोचण्यासाठी स्वतंत्र सोय करण्यात आली आहे. ओला-उबरसह सर्व टॅक्सी सेवांसाठी देखील स्वतंत्र पिकअप-ड्रॉप पॉइंट्स निश्चित करण्यात आले आहेत.

कार्यक्रमासाठी येणाऱ्या वाहनांची गर्दी टाळण्यासाठी 'ब्ल्यू', 'ऑरेंज' आणि 'पिंक' अशा तीन रंगांमध्ये पार्किंगचे वर्गीकरण करण्यात आले आहे. प्रत्येक रंगानुसार विशिष्ट मार्ग व जिल्हे निश्चित करण्यात आले असून, त्यानुसार वाहनचालकांना पार्किंग स्थळी मार्गदर्शन केले जाणार आहे.

ब्ल्यू पार्किंग (नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर आदी मार्गे येणाऱ्या वाहनांसाठी)

ओवे कॅम्प मैदान, इनामपुरी क्रिकेट मैदान, श्री सत्य साई हॉस्पिटल परिसर, मेट्रो स्टेशनजवळील मैदाने आदी ठिकाणी बस व कार पार्किंगची सोय करण्यात आली आहे. या विभागात सुमारे ५५० बसेस आणि ११३५ कार पार्किंगची क्षमता उपलब्ध आहे.

ऑरेंज पार्किंग (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर आदी जिल्ह्यांतून येणाऱ्या वाहनांसाठी)

पापडीचा पाडा सर्कल, सेक्टर ३५ ई, सेक्टर ३३, ३२, २७ आणि २३ मधील विविध मैदाने येथे मोठ्या प्रमाणावर पार्किंगची व्यवस्था आहे. या विभागात ४०० बसेस आणि तब्बल ४९९० कार पार्किंगची क्षमता उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पिंक पार्किंग (मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर येथून येणाऱ्या वाहनांसाठी)

सेक्टर २४, १४, ११, १६, ७, ४, ८ आणि १० मधील मैदाने तसेच लिटल वर्ल्ड मॉल परिसर येथे वाहनतळ निश्चित करण्यात आले आहेत. या विभागात २०० बसेस आणि २५६० कार पार्किंगची सुविधा आहे.

याशिवाय, कार्यक्रमाच्या बंदोबस्तासाठी नियुक्त पोलिस व शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वाहनांसाठी सेंट्रल पार्क, सेक्टर ६ परिसर आणि गुरुद्वारामागील टनेल रोड येथे स्वतंत्र पार्किंग राखीव ठेवण्यात आले आहे. येथे सुमारे १४५० कार आणि १००० मोटारसायकली उभ्या करण्याची क्षमता आहे.

कार्यक्रमादरम्यान वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि भाविकांना सुलभ प्रवेश मिळावा यासाठी प्रशासनकडून मार्गदर्शक फलक, स्वयंसेवक आणि पोलीस बंदोबस्ताचीही व्यवस्था करण्यात येणार आहे. आयोजकांनी भाविकांनी दिलेल्या रंग-कोडनुसार पार्किंगचा वापर करावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

वाहतूक व्यवस्था व पार्किंग व्यवस्थेबद्दल नवी मुंबई वाहतूक शाखेचे उपायुक्त (वाहतूक ) तिरुपती काकडे यांनी सांगितले की, खारघर येथे 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने या परिसरामध्ये जवळपास 33 ठिकाणी पार्किंगची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. प्रत्येक पार्किंगच्या ठिकाणी पिकअप आणि ड्रॉप सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे; म्हणजे, ज्या ठिकाणी पार्किंगमध्ये आपण वाहन लावाल, तिथून कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी मोफत पिकअप आणि ड्रॉपची सोय करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर, या ठिकाणी येणारे ओला, उबर आणि टॅक्सी यांच्यासाठीसुद्धा पिकअप आणि ड्रॉपची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून, दिनांक 28 फेब्रुवारी आणि 1 मार्च या दोन्ही दिवशी सकाळी 6:00 वाजल्यापासून ते रात्री 11:00 वाजेपर्यंत नवी मुंबईच्या आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये जड आणि वाजड वाहनांना प्रवेश करण्यास आणि पार्किंग करण्यास बंदी घालण्यात आलेली आहे. त्याचबरोबर, खारघरमध्येसुद्धा वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून, काही ठिकाणी रस्ते, पर्यायी रस्ते निर्माण केलेले आहेत आणि काही रस्त्यांवरती वाहतूक प्रतिबंधित करण्यात आलेली आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने येणाऱ्या भाविकांना आणि नागरिकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून, वाहतूक शाखेकडून एक डीसीपी, एक एसीपी, 20 अधिकारी आणि 500 अंमलदार यांच्यासोबत 500 वार्डन नेमण्यात आलेले आहेत; ज्यामुळे वाहतूक जी आहे, ती सुव्यवस्थित राखण्यासाठी मदत होईल.

काही ठिकाणी वाहनं बंद पडण्याची संभावना लक्षात घेता, पुरेसा प्रमाणात क्रेन नेमण्यात आलेले आहेत. टोइंग व्हेईकल उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सर्व पार्किंगच्या वाहनतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरती आणि कार्यक्रमाच्या ठिकाणी येणाऱ्या रस्त्यावरती सर्वत्र साइन बोर्ड्स लावण्यात आलेले आहेत. एकंदरीत, या कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी सर्व प्रकारची वाहतूक व्यवस्था अबाधित राहील यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. कुठल्याही प्रकारचा अडथळा होणार नाही, यासाठी वाहतूक पोलीस आणि नवी मुंबई पोलीस सज्ज आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लोणीकंद ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच पदी डॉ. सोनाली श्रीकांत जगताप

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : हवेली तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या लोणीकंद ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच पदी डॉ.सोनाली श्रीकांत जगताप यांची निवड जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित हवेली तालुका पंचायत समितीच्या सदस्या मोनिका श्रीकांत कंद यांनी आपला लोणीकंद ग्रामपंचायतीचा सरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त असलेल्या सरपंच पदासाठी सरपंच पदाचा कार्यभार विद्यमान उपसरपंच असलेल्या डॉ.सोनाली श्रीकांत जगताप यांना प्रभारी सरपंच म्हणून नुकताच स्वीकारला. लोणीकंद ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंच म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ.सोनाली श्रीकांत जगताप यांचा सत्कार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा पिडीसीसी बँकेचे संचालक प्रदिप विद्याधर कंद, बाजार समितीचे माजी उपसभापती नारायण कंद, माजी आदर्श सरपंच श्रीकांत कंद, बाजार समितीचे माजी उपसभापती तथा संचालक रविंद्र कंद, पंचायत समितीचे सदस्य मोनिका कंद, उद्योजक हनुमंत कंद यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी माजी सरपंच राहुल उर्फ बापूसाहेब शिंदे, माजी सरपंच तथा सदस्या प्रियांका झुरुंगे, माजी सरपंच सुलोचना झुरुंगे, माजी सरपंच ओंकार कंद, माजी उपसरपंच सुजाता कंद, माजी उपसरपंच तथा सदस्य अतुल मगर, सदस्य आशिष गायकवाड, माजी उपसरपंच तथा सदस्य नंदकुमार कंद, माजी उपसरपंच तथा सदस्य सुधीर कंद, दिपाली राऊत, सागर कंद, गौरव झुरुंगे, सरस्वती दळवी, कावेरी कंद, ग्रामविकास अधिकारी जालिंदर बोरवणे, डॉ.श्रीकांत जगताप, आदी पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

### महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्सचे बेमुदत संप 5 मार्चपासून; सेवा विस्कळीत होण्याची शक्यता

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील खासगी बस, रिक्षा, टॅक्सी आणि मालवाहू वाहतूकदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी 'महाराष्ट्र ट्रान्सपोर्टर्स ॲक्शन कमिटी' च्या वतीने बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती कमिटीचे प्रसन्न पटवर्धन, बाबा शिंदे आणि नितीन पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. हे आंदोलन दि. ५ मार्चपासून बेमुदत होणार असून या आंदोलनामुळे शाळा बस, कर्मचारी वाहतूक आणि आंतरराज्य बस सेवा विस्कळीत होण्याची शक्यता असून, याचा मोठा फटका सामान्य जनतेला बसणार आहे. सरकारकडून रस्ते विकासाच्या नावाखाली इंधनावरील अधिभार आणि टोल अशा दुहेरी करांची वसुली केली जात आहे. खराब रस्त्यांमुळे होणाऱ्या अपघातांना कंत्राटदारांऐवजी वाहनचालकांना जबाबदार धरले जात असल्याचा आरोप पटवर्धन यांनी यावेळी केला. त्याचबरोबर आरटीओकडून फिटनेस सर्टिफिकेटसाठी केली जाणारी सक्ती, ई-चलन प्रणालीतील जाचक अटी आणि सीमा तपासणी नाक्यांवरील बेकायदा वसुली यांमुळे वाहतूकदार हवालदिल झाले आहेत. शासनाने दुहेरी टोल आकारणी आणि अन्यायी कर प्रणाली रद्द करावी, वाहनधारकांवरील 'रेट्रो फिटमेंट'ची सक्ती थांबवावी, ई-चलन प्रणालीतील त्रुटी दूर करून ५० टक्के दंडाची अट रद्द करावी तसेच, वाहतूक क्षेत्रातील तक्रारींच्या निवारणासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था स्थापन करावी आदि मागण्या असल्याचे पवार यांनी सांगितले. या संपात सुरुवातीला शाळा बस आणि प्रवासी गाड्या सहभागी होणार आहेत. तर पुढील टप्प्यात दूध आणि इंधन टँकरही सामील होण्याची शक्यता आहे. १५ दिवसांपूर्वीच या आंदोलनाची सूचना प्रशासनाला देण्यात आली असून, सरकारने त्वरित सकारात्मक निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा बाबा शिंदे यांनी यावेळी दिला.

### चारित्र्यच्या संशयावरुन पत्नीच्या खुनासाठी मयूर गायकवाडला जन्मठेप

बारामती (दैनिक संध्या) : पत्नीचा खून करत पुरावे नष्ट केल्याच्या खटल्यात मयूर गोरख गायकवाड (रा. शक्तिछाया हॉस्पिटलसमोर, यवत, ता. दौंड) याला येथील जिल्हा न्यायाधीश एस. आर. पाटील यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ही घटना दि. 18 जानेवारी 2014 रोजी घडली. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत माहेरहून पैसे आणण्याच्या कारणावरून तिला शिवीगाळ व दमदाटी करत पत्नी प्रमिला यांचा मयूर याने गळा दाबून खून केला. पत्नीने स्वतःहून गळफास घेतल्याचा बनाव रचत पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याबाबत दि. 19 जानेवारी 2014 रोजी अरुण रामदास जाधव यांनी यवत पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी मयूर याच्यावर गुन्हा दाखल केला होता. या खटल्यात सरकारपक्षाच्या वतीने ॲड. ज्ञानदेव शिंगाडे यांनी काम पाहिले. त्यांनी एकूण सात साक्षीदार तपासले. डॉ. रमेश जाधव यांची साक्ष यात महत्त्वपूर्ण ठरली. हाताने गळा दाबून मयताचा खून झाला असल्याचे त्यांनी सांगितले. तपासी अधिकारी बी. एन. गावडे यांचीही साक्ष नोंदविण्यात आली. उपलब्ध साक्षी व ॲड. शिंगाडे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने जन्मठेप व दहा हजार रुपये दंड व दंड न भरल्यास आणखी दोन महिने साधी कैद तसेच पुरावा नष्ट केल्यामुळे 7 वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात दौंडचे उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस, पोलिस निरीक्षक नारायण देशमुख, उपनिरीक्षक गोरख कसपटे, अंमलदार वेणुनाद ढोपरे यांनी सरकार पक्षाला साहाय्य केले.

# सासवड नगरपरिषदेचा ३९२ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

**कोणतीही करवाढ नाही**

सासवड (दै. संध्या)

सासवड शहराच्या सर्वांगीण विकासाची नवी दिशा स्पष्ट करणारा आणि सर्वसामान्यांच्या खिशाला कोणताही फटका न देणारा सासवड नगरपरिषदेचा सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प शुक्रवारी (ता. २७) मंजूर करण्यात आला. नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत ३९२ कोटी ६५ लाख रुपयांच्या खर्चाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. खेळीमेळीच्या वातावरणात ही सभा संपन्न झाल्याचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी सांगितले.

या अर्थसंकल्पात प्रशासनाने कोणतीही कर वाढ सुचवलेली नाही. सन २०२६-२७ मध्ये नगरपरिषदेला महसुली आणि भांडवली अशा दोन्ही स्वरूपात मिळून एकूण ४२६ कोटी १४ लाख रुपयांची जमा अपेक्षित धरण्यात आली आहे. तर दुसरीकडे, शहराच्या विकासासाठी आणि प्रशासकीय कामांसाठी ३९२ कोटी ६५ लाख रुपये खर्च होणार असल्याचे नियोजित करण्यात आले आहे. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सासवड शहराच्या सौंदर्यीकरणासोबतच पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणावर मोठा भर दिला जाणार असल्याचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी सांगितले. नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना या अर्थसंकल्पातून न्याय देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने नवीन पाणीपुरवठा योजना, नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी नमो उद्यान, सांडपाणी व्यवस्थापनासाठी 'भुयारी गटर २' आणि पर्यावरण संवर्धनासाठी 'माझी वसुंधरा' यांसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा समावेश आहे. केवळ भौतिक सुविधाच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत शासन नियमाप्रमाणे दिव्यांग कल्याण, महिला व बालकल्याण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येकी पाच टक्के निधीची विशेष तरतूद करण्यात आली आहे.



सभेच्या कामकाजादरम्यान नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्यासह सर्व उपस्थित नगरसेवक आणि नगरसेविकांनी शहराच्या प्रलंबित कामांबाबत आणि भविष्यातील नियोजनाबाबत सविस्तर चर्चा केली. सभेच्या शेवटी नगराध्यक्षांनी या अर्थसंकल्पाचे स्वागत करत सर्वांचे आभार मानले. यावेळी मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी प्रशासनाच्या वतीने आभार व्यक्त केले. या विशेष सभेला सर्व नगरसेवक, विविध विभागांचे प्रमुख आणि नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

## "महाराष्ट्राची हस्यजत्रेची रंगपंचमी – खेळ खेळूया होळीचा" उत्साहात संपन्न

पुणे (दै. संध्या)

सोनी मराठी वाहिनी आणि 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या संपूर्ण टीमने यंदाची रंगपंचमी मोठ्या जल्लोषात साजरी केली. "हस्यजत्रेची रंगपंचमी – खेळ खेळूया होळीचा" या विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व कलाकार एकत्र येत रंग, संगीत आणि नृत्याच्या ठेक्यावर रंगपंचमीचा आनंद लुटला. या रंगतदार सोहळ्यास कार्यक्रमाचे दिग्दर्शक व निर्माते सचिन गोस्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच समीर चौगुले, प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, श्याम राजपूत, मंदार मांडवकर, शिवाली परब, रोहित माने, वनिता खरात, प्रथमेश शिवलकर ओंकार राऊत, अरुण कदम, निखिल बने, दत्तू मोरे आणि विराज जगताप हे सर्व कलाकार उपस्थित होते. सोबतच 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' टीमची संगीत टीमदेखील या उत्सवात सहभागी झाली होती. या कार्यक्रमात कलाकारांनी गाणी गात, ठेका धरत आणि तुफान डान्स करत रंगांची उधळण केली. यासोबतच धमाल असे निरनिराळे गेम्सदेखील कलाकारांनी खेळले आणि एकमेकांसोबत हास्यविनोद करत रंगपंचमीचा आनंद द्विगुणित केला. पारंपरिक आणि धमाल गाण्यांवर सगळ्यांनी एकत्र येत रंगपंचमी साजरी केली. रंगांच्या उधळणीसोबत हास्याचा वर्षावही पाहायला मिळाला. संपूर्ण वातावरणात उत्साह, मैत्री आणि आनंदाची रंगत पाहायला मिळाली. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' परिवाराने एकत्र येत साजरी केलेली ही रंगपंचमी प्रेक्षकांसाठीही खास ठरली. सोबतच महाराष्ट्रातील आणि जगभरातील सगळ्या प्रेक्षकांना सोनी मराठी वाहिनी आणि महाराष्ट्राची हास्यजत्रा टीम तर्फे होळी आणि रंगपंचमी च्या शुभेछया देखील दिल्या. या कार्यक्रमाची विशेष झलक महाराष्ट्राची हास्यजत्रा कार्यक्रमाच्या येत्या भागात दाखवली जाणार आहे. तर पाहायला विसरू नका " महाराष्ट्राची हास्यजत्रा" सोम आणि मंगळवार रात्री ९ वाजता सोनी मराठी वाहिनीवर.

## पिसुर्टीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

### *विविध स्पर्धांतून विद्यार्थ्यांचा अभिमानास्पद सहभाग*

जेजुरी (दै. संध्या)

पिसुर्टी,( ता. पुरंदर) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. स्वप्निल गोपीनाथ बरकडे मित्रपरिवार यांच्या वतीने हा प्रेरणादायी कार्यक्रम राबविण्यात आला. वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धा अशा विविध स्पर्धांचा समावेश करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी लहान गट, मध्यम गट आणि खुला गट अशा तीन विभागांत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून एकूण ११० स्पर्धकांनी भाग घेतला. शिवचरित्र, स्वराज्याची संकल्पना आणि शिवरायांचे पराक्रम हे प्रमुख विषय ठेवण्यात आले होते. लहान गटातील विद्यार्थ्यांनी निरागस पण प्रभावी वक्तृत्व सादर केले, तर मध्यम गटातील विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या कार्याचा सखोल अभ्यास मांडला. खुल्या गटातील स्पर्धकांनी ऐतिहासिक संदर्भ देत प्रभावी भाषणे करून उपस्थितांची दाद मिळवली. निबंध स्पर्धेत स्वराज्य स्थापनेमागील विचार, जिजाऊंचे संस्कार आणि मावळ्यांचे योगदान यावर लेखन झाले, ज्यातून विद्यार्थ्यांच्या मनातील देशप्रेम प्रकर्षाने जाणवले. चित्रकला स्पर्धेत किल्ले, राज्याभिषेक सोहळा तसेच सिंहगड व रायगड यांची सुंदर चित्रे साकारण्यात आली, रंगसंगतीतून भगव्या ध्वजाचे तेज विशेष उठून दिसत होते. कार्यक्रमस्थळी शिवरायांचा प्रेरणादायी फोटो लावण्यात आला होता आणि देशभक्तीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिसुर्टी येथील मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांच्या विशेष सहकार्यामुळे संपूर्ण नियोजन सुयोग्य पद्धतीने पार पडले. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. उत्कृष्ट स्पर्धकांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची प्रमाणपत्रे व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले, तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून अशा उपक्रमांमुळे इतिहासाबद्दलची आवड वाढते व नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य आणि सर्जनशीलता विकसित होते, असे मत व्यक्त केले. पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात कार्यक्रमाची सांगता झाली आणि पिसुर्टी येथे जयंती उत्साह, प्रेरणा व संस्कारांचा संगम ठरली; भविष्यातही असे उपक्रम राबविण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.




## महावितरणच्या कामगिरीचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने गौरव

पुणे (दै. संध्या)

सर्वाधिक अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून देशात प्रथम क्रमांक पटकावण्याच्या महाराष्ट्राच्या कामगिरीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या महावितरणचा 'बिग इम्पॅक्ट' पुरस्काराने मुंबई येथे बुधवारी (२५ फेब्रुवारी) गौरव करण्यात आला. मुंबईतील सहारा स्टार हॉटेलमध्ये आयोजित या कार्यक्रमात ९२.७ बिग एफएम या लोकप्रिय रेडिओ चॅनलच्या वतीने विविध क्षेत्रात कल्पकता व नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे समाजावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा पुरस्काराने गौरव करण्यात आला. मुंबई महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती रितू तावडे आणि अभिनेत्री ईशा देवोल यांच्या हस्ते महावितरणच्या वतीने कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता श्री. प्रवीण परदेशी, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार यांनी हा पुरस्कार स्वीकारला. राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. आशिष शेलार, जेष्ठ अभिनेते बोम्मण ईराणी यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला होती. पुरस्कार वितरणाच्या नेत्रदिपक कार्यक्रमाला तर सिनेसृष्टी, सामाजिक, राजकीय, उद्योग, कला क्षेत्रातील नामवंत उपस्थित होत्या.




ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे ८८.५० लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. राज्याच्या या यशात महावितरणची कामगिरी प्रमुख आहे. शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट ८० पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. तसेच औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे.

## विमानतळ भूसंपादनासाठी ३ हजार एकरला, ६ हजार कोटींची तरतूद?

पुणे (दै. संध्या)

■ शेतकऱ्यांना मोबदला आणि प्रकल्पाबाबत अधिकृत माहितीची अपेक्षा

पुरंदर तालुक्यातील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी 3 हजार एकर जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. या भूसंपादनासाठी 6 हजार कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आली आहे. मंजूर कर्ज आणि संपादन करावयाचे क्षेत्र याचा विचार केल्यास शेतकऱ्यांना प्रतिएकरी 2 कोटी रुपये मोबदला देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे का? अशी चर्चा सध्या सुरू आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य मंत्रिमंडळाच्या 10 फेबुवारीच्या बैठकीत विमानतळ भूसंपादनासाठी आवश्यक सहा हजार कोटींच्या निधीसाठी कर्ज उभारणीस मान्यता दिली आहे. हे कर्ज उभारणीसाठी विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापना केली आहे. त्यात एमआयडीसी, एमएडीसी आणि सिडको यांचा समावेश केला आहे. पुढील पंधरा दिवसांत या निधीतून शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते. दरम्यान, पंधरा दिवस उलटूनही मोबदला देण्यात आलेला नाही.

# देशाच्या पायाभूत विकासामध्ये स्थापत्य अभियंत्यांचे मोलाचे योगदान

पुणे (दै. संध्या)

■ डॉ. राजेंद्र डहाळे यांचे प्रतिपादन; बिल्डर्स असोसिएशनतर्फे रोहिदास मोरे यांना 'निर्माणरत्न २०२५' जीवनगौरव पुरस्कार प्रदान

■ बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया आयोजित २९ व्या 'वेल बिल्ट स्ट्रक्चर कॉम्पिटिशन २०२५'चे पारितोषिक वितरण उत्साहात




"देशाच्या पायाभूत विकासामध्ये स्थापत्य अभियंते, वास्तुविशारद आणि बांधकाम व्यावसायिकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. बदलत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून बांधकाम क्षेत्राची गुणवत्ता व सुरक्षितता वाढविण्याला प्राधान्य द्यावे," असे प्रतिपादन गुन्हे अन्वेषण विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. राजेंद्र डहाळे यांनी केले.

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे सेंटरतर्फे आयोजित आणि बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड प्रायोजित २९ व्या 'बीएआय-शिर्के वेल बिल्ट स्ट्रक्चर कॉम्पिटिशन २०२५' या पुरस्कार वितरण सोहळ्यात डॉ. राजेंद्र डहाळे बोलत होते. हॉटेल शेरेटॉन ग्रँडमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी ऑल इंडिया 'बीएआय'चे माजी अध्यक्ष आर. राधाकृष्णन, बी. जी. शिर्के कंपनीचे उपाध्यक्ष आर. बी. सूर्यवंशी, 'बीएआय' महाराष्ट्राचे अध्यक्ष जगन्नाथ जाधव, बीएआय पुणे सेंटरचे अध्यक्ष अजय गुजर, 'डब्ल्यूबीएससी'चे अध्यक्ष सुनील मते, उपाध्यक्ष महेश मायदेव व सचिव राजाराम हजारे, सचिव सी. एच. रतलानी, खजिनदार महेश राठी आदी उपस्थित होते.

यंदा 'बीएआय-पद्मश्री बी. जी. शिर्के जीवनगौरव पुरस्कार' (निर्माणरत्न २०२५) युनिव्हर्सल ग्रुपचे संस्थापक रोहिदास उर्फ दादासाहेब मोरे यांना प्रदान करण्यात आला. पुणेरी पगडी, शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि एक लाख अकरा हजार रोख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. मोरे यांनी पुरस्काराची रक्कम कामगारांच्या मुलांना शैक्षणिक मदत करण्यासाठी 'बीएआय'कडे सुपूर्द केली. यावेळी बांधकाम क्षेत्रातील विविध विभागात उल्लेखनीय काम करणाऱ्या कंपन्यांना सन्मानित करण्यात आले.

राजेंद्र डहाळे म्हणाले, "स्पर्धेतील विजेत्यांनी बांधलेले फ्लॅट, पूल आणि औद्योगिक इमारतींचे बांधकाम अतिशय दर्जेदार आहे. हे पाहून माझ्या १९८९-९२ च्या सिडकोतील सेवाकाळातील आठवणींना उजाळा मिळाला. सध्या देशात महामार्ग, विमानतळ आणि मोठ्या औद्योगिक प्रकल्पांचे जाळे विणले जात आहे, जिथे तरुण अभियंत्यांना आपली कौशल्ये दाखवण्याची मोठी संधी आहे. अशा प्रकारच्या स्पर्धांमधून बांधकाम क्षेत्रातील नावीन्यता, वैविध्यपूर्ण अविष्कार सर्वांसमोर येत आहेत."

सत्काराला उत्तर देताना रोहिदास मोरे म्हणाले, "देशातील मेट्रो, समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू यांसारख्या पायाभूत प्रकल्पांमुळे विकासाला गती मिळत आहे. अशावेळी दर्जेदार, स्वस्त आणि स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून 'इम्पोर्ट सबस्टिट्यूशन'वर भर देणे आवश्यक आहे. गुणवत्तेशी तडजोड न करता वेळेत काम पूर्ण करण्यातच खरा आनंद असतो. हा पुरस्कार माझ्या आई-वडिलांना व कुटुंबाला समर्पित करत असून, सामाजिक बांधिलकीतून पुरस्काराची रक्कम संस्थेला दान करत आहे. योग्य नियोजनाद्वारेच आपण राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान देऊ शकतो."

अजय गुजर यांनी प्रास्ताविकात स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका सांगतानाच 'बीएआय'च्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. बांधकाम क्षेत्रात गुणवत्तेचे नवनवीन मापदंड प्रस्थापित करत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम असल्याचे गुजर म्हणाले. ही स्पर्धा गेल्या २९ वर्षांपासून सातत्याने आयोजित केली जात असून, निवासी संकुल, व्यावसायिक इमारती, पूल, फ्लायओव्हर आणि औद्योगिक प्रकल्प अशा एकूण १६ विविध श्रेणींमध्ये होते, असे सुनील मते यांनी सांगितले.

आर. राधाकृष्णन यांनी प्रोत्साहनपर मार्गदर्शन करताना बीएआय पुणे सेंटरचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. अशा स्वरूपाची उच्च दर्जाची स्पर्धा घेऊन बांधकाम क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व समूहांना सन्मानित करण्याचे काम प्रेरक आहे, असे ते म्हणाले. एकता कपूर व संजय आपटे यांनी सूत्रसंचालन केले. सी. एच. रतलानी यांनी आभार मानले.

### 'वेल बिल्ट स्ट्रक्चर' स्पर्धेचे विजेते

शिवालय कन्स्ट्रक्शन, श्री ओम कन्स्ट्रक्शन, कामाक्षी कन्स्ट्रक्शन्स, निर्माण डेव्हलपर्स, प्राईड बिल्डर्स एलएलपी यांना निवासी श्रेणीत, तेजस इन्फ्रा टेक, भाटे अँड राजे कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि., कंग्राळकर इन्फ्रास्ट्रक्चर यांना कमर्शियल श्रेणीत, स्कॉन प्रोजेक्ट्स आणि रतिलाल भगवानदास यांना औद्योगिक, टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड, सुमेधा इंफ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड यांना पायाभूत सुविधा उभारणी, वेस्कॉन इंजिनिअर्स लिमिटेड, एस. एस. साठे इन्फ्रा प्रा. लिमिटेड, ए. पी. असोसिएट्स यांना सरकारी प्रकल्प उभारणीत, मिलेनियम इंजिनियर्स अँड कॉंट्रॅक्टर्स लिमिटेड यांना वर्क अप टु बेअर शेल श्रेणीत, सुगम कन्स्ट्रक्शन्स व डिझाईन बिल्डिंग वर्कशॉप पुणे यांना लँडस्केप या श्रेणीमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव नोंदल्याबद्दल राजपथ इन्फ्राचा विशेष सन्मान करण्यात आला.